**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०९**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०९/०३/२०१७

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र. ०९ मंगळवार दि. १४/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता** अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दिनांक - १४/०३/२०१७ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १२९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ९**

विषय क्रमांक -१२९ मंगळवार दिनांक १४/०३/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका जा.क्र.अर्थ /अंदाजपत्रक /८५४/१७ दि.८/३/२०१७

विषय- सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्याने दिनांक १४/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. या प्रयोजनासाठी मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी, ही विनंती.

येणे प्रमाणे मा. आयुक्त साहेब यांचे पत्र

मा.सभापती स्थायी समिती यांचा अभिप्राय की,प्र.नगरसचिव अंदाजपत्रकावर विचार विनिमय व शिफारशी करणेकरिता दि.१४/३/२०१७रोजी सकाळी ११.००वा.मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

चर्चा :-

मा.स्थायी समिती सभा मंगळवार दि.१४/३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा. आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समिती सभापती साहेब यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवून स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

**मा.सभापतीसाहेब:-**अ.नगर शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता आवश्यक असणा-या मनपाच्या अर्थसंकल्पा करीता आजची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी,पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करतो. अंदाजपत्रकाचे वाचन चालू करा.विषयाचे वाचन करण्यात आले.मा.आयुक्त अंदाजपत्रक सादर करतील.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** उन्हाळ्याचे दिवस आले आहे, पाण्याची परिस्थिती गंभीर आहे. केडगांवमध्ये ४-५ दिवसांनी पाणी येते. पाणी योजनेचे पैसे शिल्लक आहे. नविन पाण्याची लाईन टाकण्याबाबत दोन महिन्यापूर्वी पत्र दिले. श्री.सोनटक्के इंजिनिअर यांनी माहिती द्यावी.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** दि.१७-०१-२०१७ रोजी आपले पत्र प्राप्त झाले. दि.०९-०२-२०१७ ला मा.उपमहापौर यांनी पत्र दिले आहे. केडगांव पाणीपुरवठा योजनेचे निविदेनुसार काम पूर्ण होवुन नळ कनेक्शन दिले. DPR तयार करतांना १० वर्षामध्ये नव्याने काही भागात वाढ झाली आहे. काही गल्ली बोळा राहिल्या आहेत. काही छोट्या मोठ्या त्रूटी राहिल्या. काही ठिकाणी रौ-हौसिंगमध्ये मागच्या पुढच्या बाजुला कनेक्शन होते. नव्याने मागच्या बाजुस लाईन टाकल्याने मागील बाजुस कनेक्शन द्यावयाचे आहे. सर्व्हे करून रिपोर्ट सादर करण्यास २० दिवस गेले. त्यानंतर फाईल कॅफोकडे व त्यानंतर मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे सादर केली. व्याजाचे रक्कमेचा वापर करण्यासाठी दि.२७ मे चा शासन निर्णय आहे. मुख्यलेखापरिक्षक यांनी व्याजाची रक्कम वापरण्यासाठी मा.शासनाची मान्यता घ्यावी, असा अभिप्राय नोंदविला आहे.

**मा.आयुक्त साहेब:-** त्या योजनेचे पैसे त्या योजनेला वापरावयाचे मुलभूत तत्व आहे. १ कोटी ३३ लाखाचा प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी शासनाकडे पाठवून मार्गदर्शन मागवू.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** पैसे केंद्र शासनाचे आहे.एका हेडवरचे पैसे दुस-या हेडवर आपण यापुर्वी वापरले आहेत. त्यावेळी शासनाची परवानगी घेतली होती का ?

**श्री.खरात,मुख्यलेखापरिक्षक :-** मुळ योजनेचा स्लोप वाढतो. मुळ योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावी लागेल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जर इस्टीमेंट दिले तर आजच प्रस्ताव सादर करू. २७ मे २०१६ नुसार शासनाकडे मान्यता घ्यावी लागेल.

**मा.आयुक्त साहेब :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सुधारित वाढीव इस्टीमेंट सादर करावयास सांगणे व शासनाकडे व्याजाची रक्कम वापरणेसाठी मंजुरी मिळणेबाबत पत्र देणे बाबत आजच कार्यवाही करावी.

**मा.सभापती साहेब :-** आपल्याकडे पैसे शिल्लक असतांना काम होत नाही, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासनाकडे याबाबत त्वरीत पत्रव्यवहार करावा.

मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रक मा.सभापती यांचेकडे सादर केले.

**मा.सभापती साहेब :-** २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी या ठिकाणी सादर केले आहे. सर्वच स्थायी समिती सदस्य , पदाधिकारी , सर्व अधिकारी , सन्माननीय सदस्य, अर्थ संकल्पाची मिटींग आयोजित केली आहे. सर्व पत्रकार, कर्मचारी यांचे या ठिकाणी स्वागत करतो. यानंतर मा.आयुक्त सो.यांनी मनोगत व्यक्त करावे अशी विनंती करतो.

**मा.आयुक्त साहेब :-**आज मा.स्थायी समितीला सन २०१७-२०१८चे अंदाजपत्रक याठिकाणी सादर करीत आहे.यामध्ये सन २०१७चे अंदाजपत्रक ५४१.२० कोटी असुन सुरूवातीची शिल्लक रू.३ ोटी ६० लाख आहे.

महसुली जमा रू.-२५७.७९ कोटी भांडवली जमा रू.- २५३.०२ कोटी

दुबेरजी जमा - २६.७९ कोटी

एकुण जमा ५३७.६० कोटी

अभिप्रेत आहे ही जमा बाजु वस्तुस्थिती आहे.

दुसरी बाजू खर्च बाजू यामध्ये

महसुली खर्च - २१३.०८ कोटी भांडवली खर्च २६७.६१ कोटी

दुबेरजी खर्च - २५.६१ कोटी एकुण खर्च ५३६.३४ कोटी

अखेरची शिल्लक ०४.८६ कोटी राहील

असा सर्वसाधारण जमा व खर्च बाबतचा गोषवारा आहे.

अंदाजपत्रक सादर करतांना ३-४ ठळक गोष्टी या ठिकाणी नमुद करू इच्छितो. यामध्ये

कै.बा.दे.दवाखाना नव्याने उभारावयाचा आहे. १९६५ साली हा दवाखाना उभारला आहे. या दवाखान्या मार्फत ग्रामीण तसेच शहरातील नागरिकांना चांगली वैद्यकिय सुविधा दिली आहे. सध्या ही इमारत जीर्ण झाली आहे. या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यांत आले आहे व ही इमारत टप्प्याटप्प्याने पाडुन नव्याने इमारतीची उभारणी करावी, लागणार आहे. शासनाकडे निधी मागणी बाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. शासनाने ५० % निधी देवु शकतो, असे पत्र दिले आहे. मा.महापौर यांनी १० कोटी ५० लाख अशी तरतुद करणेबाबत पत्र दिले आहे, त्यानुसार कळविले आहे.

पिंपळगांव माळवी तलावाचे जमिनीचे ७/१२ उता-यावर महानगरपालिकेचे नांवाची नोंद लावण्यांत आली आहे. सन १९१३ साली भूसंपादन कायद्याखाली निवाडा झाला, त्यात आपली नांवे ७/१२ उता-यावर नव्हती. मा.सभापती व मी स्वतः याबाबत पाठपुरावा केला. मा.जमाबंदी आयुक्त यांना स्वतः भेटुन पाठपुरावा

केला. व त्यानुसार ७/१२ उता-यावर महानगरपालिकेतील नांव लागले आहे. अधिकृतरित्या आपण ती मालमत्ता विकसित करण्यासाठी सुरू केली आहे. राज्य व केंद्र सरकार कडुन निधी मिळविण्यांसाठी टोकन अमौंटची तरतुद याकरीता केली आहे. प्रकल्प सल्लागार नेमण्यासाठी ही तरतुद केली आहे.

कै.बा.दे.दवाखान्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसुती होतात. वैद्यकिय सर्व उपाय योजल्यानंतर दुर्दैवाने काही प्रसंगी अडचणी येतात. प्रसंगी पेशंट दगावण्याची शक्यता असते. याकरीता महानगरपालिकेतर्फे काही तरतुद करता यावी असा मानस आहे. त्याचाही अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यांत आला आहे.

विद्युत बचतीसाठी एल.ई.डी.दिवे बसविणे संदर्भात २-३ कंपन्यांचे मुख्य प्रतिनिधी याकामासाठी भेटले असुन अल्पदरात शहरात त्यांचे काम सुरू आहे. मा.महापौर , मा.सभापती यांनाही ते भेटले. आगामी १०-१५ वर्षात या एलईडी दिवे बसविल्यास वीजेची बचत होवु शकते. निविदा काढुन टप्प्याटप्प्याने काम करणांर आहोत. जुने दिवे ते बदलून देणांर आहेत.

मीटरद्वारे पाणीपुरवठा देणे संदर्भात नगर सचिव यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे. आगामी महासभेसमोर हा विषय चर्चेला येईल. मीटरद्वारे पाणी योजना राबविण्यास मंजुरी मिळालयास उपलब्ध पाणी वापर व्यवस्थित वापरता येईल हा आमचा मनोदय आह. महानगरपालिका प्रशासनातर्फे ठळक मुद्दे या ठिकाणी मी मांडले आहेत. पाणीपुरवठा योजना , उद्यानसाठी १ कोटी ३० लाख , अमृत मधुन मंजुरी मिळाली, त्यांची अंमलबजावणी या वर्षात करण्याचा मानस आहे. पायाभूत सुविधा तसेच रस्ते दुरूस्तीसाठी प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविला आहे.

घरपट्टी पाणीपट्टी उत्पन्नाचे स्त्रोत यावर भर देण्याचा प्रयत्न करणार आहोत. आचारसंहितेमुळे मध्यंतरीचे काळात पुरेसे लक्ष देता आले नाही. उर्वरित टिम मार्फत मोठ्या प्रमाणावर वसुलीचा प्रयत्न करण्याची आमची भुमिका आहे. एप्रिल मे व जुन या काळातही मालमत्ता कर वसुलीची मोहिम सुरू राहणार आहे. बजेट मध्ये व्यक्त केलेले मनोदय वास्तवात आणण्यासाठी आमची भूमिका आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन, नविन मालमत्ता शोध मोहिम यासाठी GIS मार्फत उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. ८० ते ८५ % माहिती जमा झाली आहे. ती एप्रिल २०१७ पासुन पुढे व नविन वसुली कशी वाढविता येईल, त्याचप्रमाणे मा.चेअरमन यांनी टॉवर साठी निविदा प्रसिध्दीसाठी पाठपुरावा केला आहे. त्यामुळे दि.३१ मार्च २०१७ अखेर काही भरीव रक्कम टॅक्सच्या माध्यमातुन जमा करण्यात येत आहे.

शासकीय अनुदान कसे जास्तीत जास्त मिळविता येईल, त्यादृष्टीने प्रयत्न राहील. भुयारी गटर योजनेसाठी प्रयत्न केला आहे. राज्य शासनाने NGT मध्ये ॲफिडेव्हीट दिले आहे. पहिला टप्पात १५० कोटी अमृत मधुन सन २०१७-२०१८ मधुन कसे मिळविता येईल हा प्रयत्न राहणार आहे. सुरूवातीला ५३ कोटी निधी मंजुर करण्यात आला होता, परंतु त्याऐवजी नव्याने १५० कोटी रू.मिळणार आहे. पहिल्या संपुर्ण शहरासाठी रू.३७३ कोटीचा प्रस्ताव तयार केला होता, परंतु राज्य शासनाकडुन एका आर्थिक वर्षात एवढी मोठी रक्कम एकाच संस्थेसाठी देणे शक्य नसल्याने मोठ्या रक्कमेच्या फेजेस करणेबाबत सुचविल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला. तांत्रिक सुधारणेनंतर ५३ कोटी ऐवजी रू.१५३ कोटीवर रक्कम गेली आहे. आपण पाठपुरावा करावा. अशा काही योजना राबविण्याचा मनोदय या अंदाजपत्रकाद्वारे केला आहे.

सर्व देणे काही राज्य शासनाचे व काही महामंडळाचे आहे. वेगवेगळया ॲथॉरिटी वसुलीसाठी सक्रीय झालेल्या आहेत. त्याचे ढोबळ आकडे मा.सभापती व सर्व जनतेसाठी ज्ञात असावेत त्यसाठी येथे माहिती दिली आहे.

महावितरण कडून मुदद्दल व व्याजासह जानेवारी अखेर १४६ कोटी ८४ लाख आपली जशी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. तशा याही संस्था आहेत. त्यांची देणी आकडे सभागृहाला व जनतेला ज्ञात होणेसाठी याठिकाणी माहिती दिली आहे.

महानगरपालिकेकडे विविध विकास कामे केलेल्या ठेकेदारीची २८ कोटी तसेच महानगपालिका कर्मचारी यांचे वेतन व पेन्शनची मिळून रक्कम रु.३० कोटी तसेच स्ट्रीट लाईट इतर थकीत रक्कमा या जवळपास १० ोटीचे देणे आहे. असे एकूण अंदाजे रु.६०३.२८ कोटी वेगवेगळया माध्यमाकडुन देणी देणे बाबत सातत्याने मागणी होत आहे.मा.सभापतीं व सदस्यांना विनंती की,व्याजासह रक्कम भरणे महानगरपालिकेस शक्य होत नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आम्ही व्याजची रक्कम माफ करणे बाबत मागणी केलेली आहे. मुद्दल फेडी बाबत उर्वरीत रक्कम भरण्याबाबत आपण भूमिका घेतली असून तसा प्रस्ताव सुचवला आहे.

एनजीटी केस संदर्भात यापूर्वी वेळोवेळी सभागृहास माहिती देण्यांत आली आहे. शासनानेही स्वतंत्र गोदावरी खोरे महामंडळ यंदा केले आहे. त्यांनाही शासनाकडून थकीत रक्कम वसुल करणेसाठी तगादा सुरु केला आहे.

ढोबळ मानाने ६०३ कोटी रुपयांची देणी आहे निश्चीत स्वरुपात ही देणी आहे. शासन किंवा महामंडळ असतील या रक्कमा कशा माफ करुन घेता येतील या दृष्टीने प्रशासन प्रयत्न कणार आहे. मा.आमदार , मा.खासदार, मा.पालकमंत्री यांची मदत घेवून रक्कमा कमी कशा होतील याचाही प्रयत्न करणार आहोत. त्यानुसार आकडेवारी सांगीतली आहे. अशा प्रकारे शासनाकडून अनुदान मिळवणे व महामंडळाकडील रक्कमेवरील व्याज माफ करुन घेणेही आव्हानात्मक बाब आहे. मा.आमदार, मा.खासदार, मा.पालकमंत्री यांची मदत घेवून मार्गी लावण्याचा आगामी काळात प्रयत्न करणार आहोत.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिकेला कोणकोणत्या शासकीय कार्यालय, संस्थेकडुन येणे आहे ते ही याठिकाणी सांगावे. आपल्यालाही त्यांचेकडुन वसुली करावी लगाणार आहे. आपल्या महानगरपालिकेस आयएएस अधिकारी मिळाले आहेत. त्या वसुलीच्या रक्कमा वसुल करण्याचे दृष्टीने त्यांचा अनूभव कामी येणार आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** जिल्हापरिषदेकडे ४९.०० कोटी येणे आहे. जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत या संदर्भात बैठक घेण्यात आली आहे. महानगरपालिके मार्फत जिल्हापरिषद हद्दीतील ग्रामपंचायतीना पाणीपुरवठा केला जात होता त्याची थकीत पाणी पट्टी बिलाची ही रक्कम आहे. एकूण ६ ग्रामपंचायतीकडे ही रक्कम आहे. यापैकी ३ ग्रामपंचायतीना आज पर्यंत महानगरपालिके तर्फे पाणीपुरवठा करत आहोत टंचाई काळात मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये टँकरव्दारे पाणीपुरवठा केलेला आहे. तीही रक्कम येणे आहे. जिल्हापरिषदेस शासनाकडून टंचाई निवारणा साठी रक्कमा शासनाकडून प्राप्त होतात. त्या मधून रक्कम मीळू शकते या संदर्भात ही बैठकीत चर्चा झाली आहे. उर्वरीत ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा थांबवून रक्कमा वसुल कराव्या लागतील.

मालमत्ता कराची रु.१९० कोटीची मालमत्ता कराची थकबाकी आहे. यामध्ये शास्तीच्या रक्कमेचाही समावेश आहे. २६५ कोटी रुपये येणे मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** यासाठी शास्ती माफी करावी.

**मा.आयुक्त साहेब :-** मागील वर्षी शास्ती माफी दिली आहे जमा खर्चाचे आकडयांचा मेळ घालण्यासाठी शास्ती माफी करणे योग्य होवू शकत नाही. उलट शास्तीसह थकबाकी वसुली कशी होइल. त्यासाठी प्रयत्न करत आहोत. मागील ६-७ महिन्यात शास्तीसह रक्कमा जमा केल्या आहेत.या पुर्वी शास्ती सह टॅक्स भरणारे नागरीक भरलेल्या रक्कमाची मागणी करतील ते विसंगत होईल. त्यामुळे शास्ती माफी देता येणार नाही. १ एप्रिल नंतर वेगळा विचार करावा लागेल.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** वसुली हा प्रक्रीयेचा भाग आहे. नागरीकांची मानसिकता शास्ती माफीची असते प्रत्येक वर्षी शास्ती माफी दिली जाते त्यामुळे ते रक्कमा भरीत नाही. मोठया थकबाकी दारांकडे पाठपुरावा केला जात नाही. मोबाईल टॉवरच्या बाबतीत टेंडर प्रोसेस चालू झाल्यानंतर रक्कमा भरुन घेवून मंजुरी दिल्या आहे. जाहिरात बोर्डच्या माध्यमातून अल्प उत्पन्न महानगरपालिकेस मिळते एकाच संस्थेकडे काम नेहमी दिले जाते टेंडरची मुदत केंव्हा संपते मी याबाबत सर्व्हे करण्याबाबत सूचना केल्या आहेत. त्याबाबत माहिती द्यावी.

**श्री.सुबोध देशमुख जाहीरात कर लिपीक :-** चंगेडीया आउट डोअर्स यांचे टेंडर मंजूर असून टेंडरची मुदत अद्याप शिल्लक आहे. मुदत संपलेली नाही. एकुण ४२२ होर्डींग्ज खाजगी जागेवर आहेत एप्रिल मध्ये टेंडरची मुदत संपते.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** एप्रिल मध्ये टेंडरची मुदत संपण्यापूर्वी नव्याने टेंडरची आतापासून तयारी करावी. टेंडरची मुदत संपण्यापूर्वी नवीन टेंडरची सर्व प्रोसेस तयार करुन ठेवावी.

**मा.आयुक्त साहेब :-** बेहेरे उपायुक्त यांनी तपासून फेरनिविदा प्रक्रीया सुरु करावी.

**मा.सभापती साहेब :-** जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये ७ लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** टॅक्सच्या बाबतीत काय धोरण आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** आता निविदा अंतीम झाली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** प्रशासनातर्फे आजच अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर केलेले आहे. त्याचा अभ्यास करणेसाठी वेळ देण्यांत यावा.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी याठिकाणी सादर केले आहे. त्याचप्रमाणे मनोगत देखील या ठिकाणी व्यक्त केले आहे. ब-याचशा योजनासाठी सर्वजण पाठपुरावा घेत आहेत. पत्रकारांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते. पिंपळगांव माळवी तलाव जमिनीचे नाव लावण्यासाठी पत्रकार बंधूंनी मला सुचना केल्या होत्या सर्वांनी पाठपुरावा केला त्यामुळे महानगरपालिकेच्या नावाची ७/१२ वर नोंद लागली आहे. राज्य व केंद्राच्या वेगवेगळया योजनांचा फॉलोअप घेत आहोत. अमृत योजनेचे टेंडरही झाले आहे. सर्वात महत्वाचे संपूर्ण नगर शहरासाठी एलईडी दिवे बसविण्यात येणार आहे. नॉर्म प्रमाणे टेंडर काढले आहे. नविन टेंडर असल्यामुळे सर्वजण फॉलोअप घेतात. एलईडी दिव्यांबरोबर मुख्य चौक प्रोफेसर कॉलनी, कापडबाजार, सारसनगर, केडगांव, नेतासुभाष चौक मध्यवर्ती ठिकाणी वायफाय सेवा चालू करणार आहोत. ब-याच ठिकाणी चो-या होतात त्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची योजना आहे. परदेशात कॅमे-यातच वायफाय सुविधा देण्यांत आली आहे. त्या धर्तीवर सुविधा पुरविण्याचा आमचा मानस आहे. मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रक सादर केले ब-याचवेळा अंदाजपत्रक हे फुगीर असल्याबाबत टिका होत असते. परंतू यंदा वास्तव बजेट सादर केले आहे. वेळोवेळी कर्जाचा बोजा वाढत गेला बजेट न वाढवता यावर्षी बजेट ५४२.२० लाखाचे सादर केले आहे. सर्व खातेप्रमुख यांना विनंती की आपलेही या शहरासाठी काही देणे लागते. प्रशासनाचे वतीने दिलगीरी व्यक्त करतो आपण जो पगार घेतो तेवढे काम करणे अपेक्षीत आहे. वसुली जवळपास रुपये २५० कोटी आहे. राज्य सरकार व केंद्र सरकारकडे दंड, व्याज माफ करण्या संदर्भात प्रयत्न करणार आहोत. फुगीर बजेटमुळे महानगरपालिकेवर लोड यायचा. अंदाजपत्रकाची माहिती सर्वांना दिली आहे. मा.बोराटे व सातपुते यांनी विनंती केल्यानुसार दोन दिवसासाठी अभ्यासासाठी वेळ देण्यात येत आहे. दोन दिवसानंतर दिनांक १६/०३/२०१७ रोजी दुपारी १ वाजता सभा पुन्हा सुरु होईल. सर्व विभाग प्रमुखांनी अद्यावत सर्व माहितीसह सभेस उपस्थित रहावे.

**मा.आयुक्त साहेब :-** मा.सभापती यांनी सूचीत केल्याप्रमाणे सर्व विभाग प्रमुखांनी माहिती संकलीत करुन दोन दिवसांनी जी सभा होईल त्यावेळी सर्व विभाग प्रमुखांनी अद्यावत माहिती तयार ठेवावी. शहराच्या विकासासाठी पदाधिका-यांना माहिती उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेस प्रशासनाचे कर्तव्य आहे. खडान खडा माहिती द्यावी. मा.सदस्यांनी जर ठळक मुद्यांची माहिती दिल्यास विभाग प्रमुखांना माहिती ठेवणे सुकर होईल.

**मा.सभापती साहेब :-** मा.सदस्यांनी काही ठळक मुद्यांची यादी मा.आयुक्त यांनी सुचविल्या नुसार सादर करावी आजची सभा ही दिनांक १६/०३/२०१७पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपलिकेचे सन २०१७-१८ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त साहेब यांनी सादर केले आहे.अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे.त्यावर मा.श्री. दिलीप सातपुते व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे चर्चा करण्यासाठी दिनांक- १६/३/२०१७ रोजी दुपारी १.०० वा. सभा पुढे सुरू होईल.

**मा.श्री. सभापती साहेब :-** दिनांक १६/०३/२०१७ रोजीची तहकुब केलेले सभा सुरू करण्यात यावी. यासभेत सर्व विभाग प्रमुख हजर आहेत का ? त्याचप्रमाणे प्रत्येक लेखाशिर्षबाबत चर्चा चालू असताना विभाग प्रमुख यांनी सदस्य माहिती विचारतील त्याप्रमाणे माहिती दयावी.

**पान नं. १ वरील वाचन केले.**

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** बांधील खर्च मध्ये तरतुद केलेला पेन्शनवरील खर्च,वेतनवरील खर्च, शहर बससेवा तुट अर्थसहाय्य इ.अदा कसे करणार कुठल्याही परिस्थितीत हा खर्च करणे बंधनकारक आजची बसची अवस्था पहिले तर वाईट परिस्थिती आहे.

**मा.सभापती साहेब :-** त्याला किती बस चालू ठेवायला पाहिजे होत्या.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आपण तुट का देतो. ठराव कसा झाला सर्वांना कळाले पाहिजे.

**श्री.सोनटक्के, कनिष्ठ अभियंता :-** १५ बसेस सुरवातीला चालू ठेवायच्या अशी अट आहे. तरच तुट देण्यात येते.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** १५ बस चालू आहेत का ? बस ॲक्च्युअल चालू आहेत का ?

**मा.सभापती साहेब :-** मागे वृत्तपत्रात मा. खासदार साहेब बसला धक्का देताना फोटो आला आहे. करारनामा किती वर्षाचा आहे कोणत्या रूटवर कोणती गाडी चालू आहे याची माहिती दया.

**पान नं.५ सर्वसाधारण कर वाचन करण्यात आले**

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** सर्वसाधारण कर रू. ४१ कोटी सुचविले सन २०१६-२०१७ ला किती वसुली झाली सन २०१३-१४, १४-१५ किती वसुल झाली.

**मार्केट विभाग प्रमुख श्री. कैलास भोसले :-** आजपर्यत रू .१३ कोटी ४४ लाख सर्वसाधारण कराचे वसुल झाले आहेत.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** मालमत्ता करामध्ये सर्वसाधारण कराचा समावेश असतो.

सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षाची वसूली ची माहिती दिली.

सर्व कर मिळून आजअखेर जवळपास रू.३५ कोटी जमा झालेली आहे. मालमत्ताकराची वर्षाची मागणी रू.३९ कोटी आहे.

**मा.सभापती साहेब :-** नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टींची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल. मा.उपायुक्त (कर) कर वसूली करीता सक्षम अधिका-यांच्या प्रभाग वाईज नियुत्या केल्या आहेत.कर विभागाकडे सक्षम अधिकारी आल्याने करामध्ये वाढ होईल. सर्वसाधारण कराच्या लेखाशिर्ष मध्ये ५ टक्के वाढ करण्यात यावी.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** मोबाईल टॉवर दंड वसुली यात धरली आहे.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** प्रॉपटी टॅक्स वेगळा व दंडात्मक रक्कम वेगळी आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** मोबाईल टॉवरवरील दंडात्मक कारवाई कोणावर करणार

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** घर मालक व जबाबदार व्यक्तीवर कारवाई करणार आपल्याला भाडे कंपनी देणार, प्रॉपटी टॅक्स देण्याची जबाबदारी मालकची आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** नेमकी टॉवरची संख्या किती हाच आकडा नक्की नाही

**मा.सभापती साहेब :-**सर्वसाधारण कर एवढे वसुल होतात हे सांगीतले आपण जी वसुली करतो ती दंड त्यात धरून वसुल करतो मागची जास्तीत वसुल व्हायला पाहिजे मागच्या वर्षी पेक्षा ७०टक्के पर्यत सुध्दा वसुल झाली नाही ती वाढायला पाहिजे जी मागच्या २वर्षापेक्षा कमी आहे त्यावर काय उपाययोजना करणार.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** नव्या मालमत्ता आकारणी, मालमत्ता जप्तीची कारवाई करणार या आर्थिक वर्षात कुठलीही शास्ती माफीची योजना दिली नाही.

**मा.सभापती साहेब :-** वेळोवेळी मा. महापौर साहेब व आम्ही शास्ती माफीबाबत मागणी केलेली आहे. परंतू त्यावर निर्णय घेतलेला नाही.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** मा. आयुक्तांचे धोरण शास्ती माफी देणेचे नाही. मागच्या वेळी शास्ती माफी करूनही लोकांनी रक्कम भरली नाही लोकांची मार्च मध्ये कर भरण्याची मानसिकता असते. शास्ती माफी दिल्यास अगोदर शास्तीसह कराची रक्कम भरलेले लोक शास्तीचे रकमेची मागणी करतील त्या रकमेचे समायोजन करणे शक्य होत नाही.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** आपले मनपाचे वेगवेगळया हेडवर १००-१२५ कोटी रूपये पडून आहे लोकांच्या अपेक्षा असतात आपल्याकडे त्यातून विकासाच्या योजना राबवू शकतो शासनची परवानगी गृहीत धरून महासभेचा ठराव घेवून काही करता येणार नाही का ?

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** करता येईल.

**मा.सभापती साहेब :-** मागील काळात पाण्याचे योजनेसाठी एच.डी.पी.पाईपसाठी मंजुरी अगोदर घेतली नाही. राज्य व केंद्र सरकारीची मंजुरी आवश्यक होती एका गोष्टीला वेगळा एक न्याय व दुस-याला वेगळा न्याय हे कसे.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** त्या त्या योजनासाठी तो निधी वापरावा लागतो.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** कालच्या सभेमध्ये पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तात्काळ सादर करणेबाबत मा.आयुक्त यांनी सूचना दिल्या.त्यावर काय कार्यवाही केली.

**अभियंता श्री.सोनटक्के :-** मुख्यलेखापरिक्षक यांच्या आक्षेपाच्या त्रुटीची पुर्तता करून प्रस्ताव ऑडीटर यांचेकडून तपासून घेवून मा.उपायुक्तांकडे सादर केला आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** एकूण रक्कम किती आहे ते सांगा.

**मा.सभापती साहेब :-** अधिका-यांनी शेरा मारण्यापुर्वी प्रॅाब्लेम वाटत असतील तर अगोदर चर्चा करा. अधिकारी वेळोवेळी नवीन असतात. पदाधिका-यांना मागील माहिती असते फाईलचा प्रवास सुरू होतो निधी वेळेत खर्च होत नाही अमरधाममध्ये झाडाची फांदी महिलांच्या अंगावर पडून त्या जखमी झाल्या जखमी महीलांमध्ये एका महिलेचा हात काढावा लागला असे समजते. आपत्कलिन निधी ची तरतुद पडून आहे. ज्या ज्या निधीतील किती रक्कम शिल्लक आहे ती सांगा, त्या शिल्लक रकमेतून नवीन कामांना कार्यारंभ आदेश देता येईल.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. झिरपे :-** रूपये ४८ कोटी ४१ लाख पान नं. ७५ वर दर्शविले आहे. स्किम वाईज शिल्लक रक्कम वेगळी काढावी लागेल.

**मा.सभापती साहेब :-** हया ज्या संपूर्ण रकमा योजने वरच्या आहे त्या बाकी आहेत का ?

**मुख्य लेखा अधिकारी श्री. झिरपे :-** हो आहे. पुढच्या आर्थिक वर्षात वापरू शकतो .बजेटमध्ये जशी तरतुद होईल त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती साहेब :-** शासकीय निधीचे आकडे व्याजा सहीत रक्कम बाजुला काढा. राहिल ती मनपा फंडाची राहील. केडगाव पाणी योजनेचा मुद्दा आहे.केंद्र शासनाची स्कीम आहे आपण टेंडर काढले पाहिजे, व्याजाची रक्कम वापरण्यास परवानगी मिळाल्या नंतर रक्कम ठेकेदारला वर्ग करा. प्रोसेसला महिना दिड महिना लागेल.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** व्याजाची रक्कम वापरता येईल काय, याबाबत माहिती देतो. ज्या योजनेसाठी निधी मंजूर झालेला आहे.त्याच योजने साठी निधी वापरतायेईल.आशा प्रकारचा गेल्या वर्षी जानेवारी मध्ये जी.आर. काढला आहे.मा.शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. परवानगी पर्यतच्या काळापर्यत टेंडर प्रक्रिया करण्याबाबतीत कोणतीही अडचण नाही. मा. शासनाची परवानगी मिळाल्यानंतर वर्कऑर्डर देण्यात येईल.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** एखादी अशी केस आहे का. मा. शासनाने त्यास परवानगी नाकारली.

**मा.सभापती साहेब :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेत किती रकमेचे टेंडर वाढीव आहे. ती रकम सांगा, पत्रकारांनी आज पेपरला डिटेल बातमी छापले आहे. मा.आयुक्तांनी काल बैठकीमध्ये सर्वाना अदयावत माहिती सह बैठकीस उपस्थित राहणे बद्दल सुचना दिल्या होत्या. प्रत्येक नगरसेवकाला काम करण्यास अडचणी येतात.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** रूपये ७० कोटीची योजना होती. निविदा मंजूर झाल्यानंतर रूपये ८३ कोटी लागणार आहेत. रूपये १३ कोटी जास्त लागणार आहेत.

**मा.सभापती साहेब :-** नगरोत्थानामधील कामे झाले किती, राहिले किती,

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** सन २०१२-२०१३ मध्ये काम मंजूर असेल व ठेकेदाराचे काम केले नसेल तर ठेकेदाराला नोटीस दयायला पाहिजे, ते आपण करत नाही.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-**भावावाढीचा क्लॉज टेंडरमध्ये नाही. बांधकाममधील ९ कामे मंजूर आहे. त्यापैकी १ कामाचे फेरटेंडर करावे लागेल. टॉपअप पेट्रोलपंप ते संजोगनगर पर्यत हा रस्ता पेंडींग आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** निधी वर्ग करायला काय अडचण आहे.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-**कामांची नावनिहाय यादी फायनल झाली आहे.मा.शासनाने काम निहाय मंजूरी दिलेली आहे. त्यात आपण ठरवू ते काम आपण घेवू शकत नाही. काम निहाय मंजुरी मिळते वाढीव रकमेसाठी हे पैसे भरावे लागतील. व मुलभुत मधील रू.२० कोटीचे, रिलायन्स मधील कामास रकम टाकणे बाबत ठराव केला आहे. रक्कम वर्ग करावयाची आहे. या सर्व बाबी जावून शिल्लक रक्क्रम राहिल.

**मा.सभापती साहेब :-** जे काम होतील तेवढेच करा आजची काम गरज आहे ते पहा.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** जिथे अडचणी आहे ते काम रद्द करून नविन काम सूचवा. मा.महापौर यांचे सह सर्व पदाधीकारी आम्ही तिथे येवू.आवश्यक कामांबाबत निर्णय घेण्यात येईल. मुकुंदनगर मधील राहिलेल्या कामाला शासनाची मंजुरी घेतली का ?

**अभियंता श्री. सोनटक्के:-** मा. शासनाची मंजुरी घेतली नाही. मा.महासभेचा ठराव घेतला.मा.शासनाला प्रस्ताव पाठवावा लागेल.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** शिल्लक रक्कम राहात असेल तर कामे नव्याने ॲड करून नव्याने प्रस्ताव पाठवा.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** काही ठिकाणी कामे पुर्ण होणार नसतील तर नव्याने कामे घेता येतील.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** केडगाव पाणी पुरवठा योजनेचे टेंडरची प्रोसेस करा. सोनटक्के यांनी कार्यवाही करावी.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** आपण रस्त्यामध्ये दुकान बांधून देवू शकतो का ? रंगभूवनच्या रस्त्यावर काम केले आहे.

**नगररचनाकार विभाग श्री. पाटील :-** ओपनस्पेस मध्ये गाळे बांधून देवू शकत नाही. पब्लीक रोड नाही ,त्याला बाकी ठिकाणाहून आतजायला एन्ट्री आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** भूषणनगर मधील भाजी वाले ओपन स्पेस मध्ये रस्त्याच्या बाजुला लोक बसले तर काय अडचण आहे.

**नगररचनाकार विभाग श्री. पाटील :-** आपण रस्ता बाजू फी वसुल करून बसू शकतात. ओटे न बांधता बसता येईल.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** प्रवेशद्वारात गाळे बांधायला शासनाची परवानगी आहे काय? रंगभुवन मध्ये भविष्यात एखादी दुर्देवी घटना घडली तर त्याला जबाबदार कोण. तुम्ही मला लेखी दया. एका ठिकाणी रस्त्यामध्ये बांधायला तुम्ही तयार आहात. एकीकडे भाजीवाल्यांना दयायला तयार नाही. तुम्ही केले ते योग्य आहे का.

**मा.सभापती साहेब :-** भाजीवाल्यांना जागा देतांना या बाबत ठरावात अटी व शर्ती टाकून परवानगी दया.

**नगररचनाकार विभाग श्री. पाटील :-** जागा आपण अलॉट करणार नाही. महासभेचा ठराव उदयान विकसीत करणे बाबत चे आरक्षण आहे.पर्यायी व्यवस्था होईपर्यत व्यवस्था करता येईल.

**मा.सभापती सोहब:-**तुम्ही अशा परमिशन देवू नका. उदया एखादया कार्यक्रमात दुर्घटना घडली तर काय होईल.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे:-** रंगभुवन च्या प्रवेश व्दाराच्या जागेत गाळे काढून ११ वर्ष कराराने दिले ही बाब १०० टक्के चुकीची झाली आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** नगररचना विभागा कडील ऑडीट मध्ये ५०० कोटीचा घोटाळा झाल्याचे समजले आहे.तो विषय आम्ही येथे घेत नाही.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** महापालिकेला जागेची उपलब्धता लागेल. त्यावेळेस जागा ताब्यात घेण्यात येईल अशी अट आहे. किती वर्षाचा हा ठराव आहे.जागा देतांना मुदत टाकायला नको,आज जे कोर्ट मॅटर होतात.ते या मुळे होतात.आजच ज्या शाळा महानगरपालिकेच्या ताब्यात नाही त्या ताब्यात घेणे बाबत कोर्ट निर्णय झालेला आहे असे समजले आहे.

**मा.सभापती साहेब :-** सातपुते साहेबांचा काय विषय असेल तो बघून मार्गी लावा.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** ज्या आर्किटेक्टने प्लॅन काढला तो चुकीचा आहे का ?

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** मागील ४ वर्ष तेथे कार्यक्रम झालेले नाही. मालमत्ता पुर्ण बंद करता येणार नाही.

**नगररचनाकार विभाग श्री. पाटील :-** पर्यायी व्यवस्था होईपर्यत तात्पुरत्या स्वरूपात परवानगी देता येईल.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** स्थायी समितीचा ॲथॉराईज ठराव आहे ११ वर्षाचे कराराने देणेबाबत. लिक रोडला बांधकाम परवानगी १२ मीटर रोड मध्ये परवानगी दिली व नतर परवानगी रद्द केल्याचे पत्र का दिले फाईल मागवा.

**नगररचनाकार विभाग श्री. पाटील :-** सर्व्हीस रोड दाखवला नाही म्हणून परवानगी रद्द केली. माझे खालील - कर्मचारी कागदपत्राची स्क्रुटीनी करतात. मला सर्व पाहणे शक्य नसते. चुकानंतर लक्षात आल्या त्यानंतर त्यानुसार दुरूस्ती केली. भाजी बाजार संदर्भात बसुन काही पर्याय काढता येईल का ते तपासुन पाहतो दोन, तीन दिवसात करतो.

**पान नं. ५ वरील जाहिरात कर रू.१४ लाख २० हजार वाचन केले.**

**मा.सभापती साहेब :-** जे अनाधिकृत होर्डीग आहे त्याचे प्रमाणे कार मोठे . आहे ब-याचसे होर्डीग ओपन प्लॉटवर आहेत.त्या प्लॉटला कमर्शियल रेटने आकारले पाहिजे. त्याला निवासी परवानगी असते. मनपाच्या जागेवर सुध्दा होर्डीग आहे. प्रॉपर्टी टॅक्स घेता आला पाहिजे.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** मनपाच्या जागातील लावलेल्या होर्डीग वर जागा भाडे व जाहिरात कर घेतला जातो. मनपाच्या जागेवर होर्डीग ७२,७३ आहे.त्यांच्याकडून ॲडव्हान्स स्वरूपात कर घेतला जातो.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** रेल्वे स्टेशन पुलावरील इले. पोल वरील जाहिरात बोर्डचे पैसे भरलेले का? मागेही सभागृहात चर्चा झाली आहे. पैसे भरले नसतील संबंधीत कर्मचा-याला निलंबित करा. सभागृहाला राजपत्र वाचून दाखवा.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** ज्या ओपन प्लॉटवर जाहिरात बोर्ड लागले असतील त्या प्लॉटवर व्यवसायीक दराने कर आकारणी बाबत प्रभाग अधिकारी यांना सूचना देण्यात येतील.

**श्री.सुबोध देशमुख जाहीरात कर लिपीक :-** दि. ३१ जून २०१४ जाहिरात बोर्ड संदर्भात राजपत्रातील मुदतवाढ संदर्भातील तरतुदीचे वाचन केले.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** जाहीरात बोर्ड बाबत यावर्षी त्वरीत टेंडर प्रक्रिया सुरू करू. एप्रिल नंतर कोणत्याही प्रकारे मुदतवाढ दिली जाणार नाही.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** अगोदर पुर्ण माहिती दया, एजन्सीला परवानगी केव्हा दिली, मुदत केव्हा संपते. मुदतवाढ केव्हा दिली, त्या शिवाय या विषयला मंजुरी देणार नाही.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** या पुर्वी जाहिरात बोर्ड संदर्भात निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या,दोन एजन्सीने रक्कम सुध्दा भरलेली नाही. अर्धवट काम सोडून दिले. जाहिरात कर मागच्या वर्षीपेक्षा दुप्पट केला आहे. मंजूर असलेल्या दराप्रमाणे आपण वसुल करतो.

**मा.सभापती साहेब :-** जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखशिर्षामध्ये रू.७ लाखाची वाढ करण्यात यावी.

**पान नं. ६ अग्नीशमन विभाग तरतुदी वाचन**

**मा.सभापती साहेब :-** मोबाईल टॉवरची मागील वर्षीची वसुल किती झाला.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** मागील ३ वर्षात तरतुदी शुन्य होती. आपण फक्त मालमत्ता कराची वसुली करतो. एकुण २११ टॉवरला परवानगी दिले आहे. १५३ टॉवरला टॅक्स लावला आहे. दंडात्मक कारवाईसाठी नव्याने नेमण्यात येणा-या एजन्सीमार्फत कारवाई करण्यात येईल. ५८ टॉवरला नव्याने आकारणी करणेबाबत प्रक्रिया सुरू केली.

**श्री. झिने :-** प्रत्येक टॉवरचे मालक व भाडेकरी यांच्यातील ॲग्रीमेट मध्ये जे भाडे ठरले जाते त्यावर आकारणी केली जाते.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** करारनाम्याच्या प्रती आहेत का ? करार संपल्यानंतर नव्याने कराराची माहिती तुम्ही घेवून नविन ॲग्रीमेंट नुसार आकारणी करण्यात येते का.

**श्री. झिने :-** नव्याने झालेले करार आपल्या कडे प्राप्त होत नाही.त्यामुळे कर आकारणी करणे शक्य होत नाही.याबाबत लेखापरीक्षणात आक्षेप घेण्यात आलेले आहे.

**मा.सभापती साहेब :-** कारवाई पुढे होते का? ३ वर्षानंतर नोटीस दिले पाहिजे मागील ७-८ वर्षापासून ऑडीट पॅरा आहेत. किमान नवीन एजन्सीला सपोर्ट करा. एक टॅक्स विभागाचा कर्मचारी  व टी पी चा एक इंजि. याची नेमणूक त्या एजन्सीच्या मदतीसाठी नेमणूक करावी.वैभव जोशी , न. र. विभाग यांना ॲडीशनल चार्ज दया. कामाचे नियोजन करा. तसे आदेश काढा. हे केल्यास मनपाच्या उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणामध्ये वाढ होणार आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** एकाच टॉवरवर चार ते पाच कंपनीचे बुस्टर लावतात.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** एखादा इंजीनियर नेमा. दंडात्मक कारवाई सरसकट करा. कंपनीने परवानगी घेतली तर त्याला कर वेगळा व  विनापरवाना काम केले म्हणून शास्ती लावा.

**मा.सभापती साहेब :-** मोबाईल टॉवरसाठी स्वतंत्र बजेट हेड  पाहिजे त्यातुन कामे सुचवता येतील खर्च व जमेचे खाते उघडा.

**पान नं. १२ चा मुद्दा वाचन घनकचरा व्यवस्थापन कर**

**मा. सभापती साहेब :-**  आपण यापुर्वी  हा कर लावला का ?

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** सन २०१२-२०१३ पासून हा कर  निवासी घरांना रू.२४०/- प्रमाणे आकारणी केली जाते.

**मा.सभापती साहेब :-** हा प्रस्ताव पुन्हा महासभेसमोर पाठवा.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** मागच्या जनरल बोर्डात विषय घेतला.अमृत योजनेच्या रिफॉर्म मध्ये आपण अंडरटेकींग दिले आहे. घनकच-यावर  वार्षिक खर्च  ६ ते ६,१/५ कोटी होता. त्याचा ताण  मनपा फंडावर पडतो दरामध्ये आपण कोणतीही वाढ सुचवली नाही. संकलनाची जी पध्दत आहे. त्याबाबत मागील सभेमध्य चर्चा झाली. ठेकेदाराने वसुली करावी,अशी अट होती.यावर बरेच वादंग झाले.  रू. ४ कोटीमध्ये  घनकच-याचा खर्च भागत नाही, शासन आपणाला युजर्स चार्जेस घ्यायला सांगते.सेवाकर ऐवजी उपभोक्ता शुल्क म्हणून दुरूस्ती करावी व प्रस्ताव महासभे समोर ठेवावा.

**मा.सभापती साहेब :-** सेवाकर ऐजवी चुक दुरूस्त करून मा.महासभेसमोर प्रस्ताव पाठवावा.

**पान नं.६ अग्नीशमन  विभागा वरील तरतुदी वाचन**

**मा.सभापती साहेब :-** १ टक्के मुद्रांक शुल्क रक्कम मिळते का ?

**मुख्य लेखा अधिकारी श्री. झिरपे :-** सध्या समायोजन होते.

**मा.सभापती साहेब :-** परत नांव नोंदणीच्या वेळी कसे घेतो.

**श्री. झिने :-** कराधान नियम १ मध्ये तरतुद आहे .खरेदी खतातील किंमती वर घेतो.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** शासना मार्फत ज्या  मनपा मध्ये  एल.बी.टी. लागू नाही.अशा स्थानीक संस्थांना  ५% ने स्टॅम्प डुटी मीळते.ज्या शहरामध्ये एल.बी.टी. लागू नाही त्यांना ५ ऐवजी ६ टक्के स्टॅम्प डुटी  मिळते. ५-६ कोटी वर्षात आपल्याला मिळायचे. पूर्वी महासभेने मालमत्ता हस्तांतरण साठी खरेदी रक्कमेवर  नोंदणी फि आकारणी बाबत १% तरतुद केली आहे. त्यामध्ये आता कोणताही बदल केलेला नाही.

**मा.सभापती साहेब :-** महिन्याचे १ ते ३१ तारखेपर्यत ज्या खरेदी होतील त्याची माहिती मागवा. वेबसाईट वरून माहिती मिळयास किती वेळ लागतो.

**श्री. झिने :-** मुद्रांक शुल्क विभाग माहिती दयायला तयार नाही.

**मा.सभापती साहेब :-** ज्यावेळी महानगरपालिका रेकॉर्डला नांव लावण्यासाठी येतात.तेव्हाच वसुली होते. मधल्या काळामध्ये जे व्यवहार होतात त्याचे रेकॉर्ड आपल्या कडे उपलब्ध नसल्याने महानगरपालिकेचे उत्पन्न बुडते.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** कायदयातील तरतुदीनुसार ३ महिन्यात मालमत्ता धारकाने प्रॉपर्टी खरेदी ची माहिती महानगरपालिकेस देणे बंधनकारक आहे. मुद्रांक शुल्क विभागाशी चर्चा करून किती मालमत्ता ट्रान्सफर झाल्या याची माहिती मागविणे आवश्यक आहे.आवश्यक तो पाठपुरवा करून आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने प्रशासनाचे वतीने कार्यवाही करू.

**मा.सभापती साहेब :-** नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल.त्यानुसार रू.२५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे

**पान नं.७ कराव्यतिरिक्त उत्पन्न वाचन केले.**

**पान नं. ८ मनपा सेवापासून मिळालेले उत्पन्न वाचन केले.**

**पान नं.९ गाळा भाडे तरतुदीचे वाचन**

**मा.बाळासाहेब बोराटे :-** गाळे भाडे किती तरतुद केली, सन १६-१७ मध्ये किती वसुल केले.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** रूपये ६५ लाख वसुल झाले आहेत.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** मंगल कार्या. भाडे उत्पन्न किती धरले. यात १००% वसुली होते. मग गाळे भाडे का १००% वसुल होत नाही. आपण तरतुद करतो पण १००% वसुली होत का नाही. याला कोण जबाबदार.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** गाळे जप्तीची कारवाई सुरू आहे. ३१/८/२०१५ चे ठरावाने गाळे भाडे वसुल करण्याची कारवाई सुरू आहे .या ठरावा नुसार चालू रेडीरेकनर प्रमाणे भाडे व डिपॉ.भरणे बाबत नोटीसा देण्यात आल्या आहेत.त्या नंतर प्राप्त हरकतींवर सुनावणी घेतल्या.दरम्यानच्या काळामध्ये गाळेधारकांनी या ठरावानुसार सुधारीत भाडे व डिपॉझीट बाबत गाळेधारकांनी आक्षेप घेतले. मा.पदाधीकारी यांची भेट घेवून ,जुन्या दराप्रमाणेच गाळा भाडे वसूल करण्याची केलेल्या मागणी नुसार जुन्या दराप्रमाणेच वसूली केली जात आहे.

**मा.सभापती साहेब :-** चालू रेडीरेकनरच्या दरानुसार भाडे आकारणी केल्यास उत्पन्नात भर पडणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** शहराच्या मध्य वस्तीमध्ये सध्या अस्तीत्वात असलेले म.न.पा.चे मंगलगेट मटन मार्केट ची दुरास्था झालेली असल्याने सदरचे मार्केट विकसीत करणे अत्यंत आवश्यक असून या करीता जमा बाजूतील मार्केट विभाग वसूल करीत असलेल्या गाळे भाडे पोटी येणा-या उत्पन्नातुन हा खर्च भागविण्यात यावा.या करीता मंगलगेट मटन मार्केट दुरूस्ती हे नविन लेखाशिर्ष तयार करावे.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** गाळे हस्तांतर फि या लेखाशिर्षा मध्ये किती तरतुद करण्यात आली आहे.

**मार्केट विभाग प्रमुख श्री. भोसले :-** गाळे हस्तांतर फि या लेखाशिर्षा मध्ये रू.८५ लाख तरतुद करण्यात आली आहे.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** गाळे हस्तांतरणाची प्रक्रिया सोईस्कर करून गाळे धारकांना या बाबतची माहिती देवून गाळे हस्तांतरण करणे बाबात प्रवृत्त करून या लेखाशिर्षामध्ये रू.१५ लाखांनी वाढ करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** हस्तातंरणाची प्रक्रिया त्वरीत राबवून रू.१५ लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** स्लॉटर फी व रस्ता बाजू फी माहिती दया.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** मागील ठेकेदाराने काम अर्धवट सोडले. त्यानंतर २-३ वेळा निविदा प्रसिध्द केली. परंतू प्रतिसाद न मिळाल्याने मनपा कर्मचा-यामार्फत वसुली केली. एकविरा चौकातील भाजी विक्रेत्यांना खाजगी जागेत स्तलांतरीत केले गेले.सदर चे किमान दोनशे भाजी विक्रेते होते. तसेच अतिक्रमणे मोहिमेमध्ये अनेक रस्त्यावरील व्यवसायीकांना रस्त्यावर विक्री करण्यास प्रतिबंध केल्याने रस्ता बाजु फि पासुन मिळणारे आपेक्षीत उत्पन्न घटल्याने या निविदेची रक्कम कमी करावी लागली. स्लॅटर फि खाजगी अभिकर्तामार्फत वसूल केली जाते. चालू टेंडरची मुदत संपली असून दि.३१ मार्च पर्यत मुदतवाढ दिली आहे. दिलेल्या दरापेक्षा १०% वाढ करून मुदतवाढ दिली.

**मा.सभापती साहेब :-**अनधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे रूपये ८ लाख उत्पन्न गृहीत धरले त्याची माहिती दया.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** बांधकाम परवानगी नसेल तर परवानगी मागण्यासाठी महानगरपालिकेकडे आल्यानंतर कलम ४१ खाली प्रस्ताव दाखल केल्यानंतर महासभेने दंडात्मक आकरणी करून बांधकाम नियमानुकुल करण्यास मंजुरी दिली जाते. त्यानुसार दंड आकारून परवानगी दिली जाते. जे बांधकाम नियमात बसतात त्यांनाच मंजुरी दिली जाते.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** धार्मिक स्थळाजवळील बांधकाम परवानगीच्या बाबतीत कुठेतरी शिथीलता आणा. माळीवाडयात २-३ वॉर्ड यामुळे बाधीत झाले आहेत.नगरसेवकांना हाताशी धरून बांधकाम केली जाते. मनपाचे उत्पन्न बुडते त्यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** प्रशासनाकडून टेक्नीकल बाबी व कमी महसुला बाबत बाबी नमुद करून प्रस्ताव पाठवा.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** पाठवून देवू.

**मा.सभापती साहेब :-** प्रत्येक वेळेस शहरातील प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डात ही समस्या आहे. कोठला झोपडपटटी मध्ये भयानक अतिक्रमण झाले आहे. अनधिकृत बांधकामांना टॅक्स लावला जातो का. सर्वसामान्य माणासने पूर्ण टॅक्स भरायचा, झोपडपटीचा विषय सोडून ज्यांनी विनापरवाना आर.सी.सी. बांधकाम २-३ मजले उभारले त्यांना टॅक्स आकारला पाहिजे. बोराटे सो. संगितल्या प्रमाणे बांधकाम परवानगीत सुलभता येण्यासाठी सविस्तर प्रस्ताव पाठवा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ऐतीहासीक व धार्मीक स्थळाचे फोटो पाठवा. किती बाय किती आहे. दिल्ली मधील अधिका-यांना काय माहिती आहे येथे नेमकी काय वस्तुस्थिती आहे.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** मनपाच्या प्रॉपर्टी चे परमिशन व ३०० मीटर चे परिसरातील बांधकाम परवानगी बाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती साहेबः-**कलम४१ खाली प्रस्ताव दाखल केल्यानंतर महासभेने दंडात्मक आकरणी करून जास्तीत जास्त उपन्न वाढीच्या दृष्टीने प्रयत्न करून या लेखाशिर्षा मध्ये रू.१० लाखांनी वाढ करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** आजची अंदाजपत्रकीय सभा उदया सकाळी ११.०० वा दिनांक १७/०३/२०१७ रोजी तोपर्यत तहकुब करण्यात येत आहे.

**<u>मा. स्थायी समिती सभा दिनांक १७/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा सभा सुरू.</u>**

**मा.सभापती साहेब :-** कालची तहकुब केलेली सभा सुरू करावी.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आजच्या वृत्तपत्रात पाणीपुरवठा बंद होणार अशी बातमी आली आहे. त्या बाबतची माहिती दया.

**मुख्यलेखाअधिकारी श्री. झिरपे :-** रूपये ३० लाख मुळा धरणाच्या विज बीलाचे दिले आहेत व रू.२० लाख स्ट्रीट लाईट बीलाचे दिले आहेत.उर्वरीत रकमेचे त्यांच्या मागणी नुसार पैसे भरणे बाबतचे आपण त्यांना शेडयुल देणार आहोत .

**मा.उपायुक्त श्री. चारठाणकर :-** साधारणपणे चालू बिलाची रू.१४ कोटी देणे आहे. वारंवार ते पत्रव्यवहार करतात काही रक्कम आजच जमा केली आहे.तुम्ही थकबाकी बाबत मा.शासनाकडे प्रस्ताव पाठवा असे त्यांनी सांगितले आहे. तो आम्ही लवकरच पाठवणार आहोत .त्यांना विनंती केली आहे की डीसकनेक्शन करू नका. आपल्या विनंतीला मान देतीलअशी अपेक्षा आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अत्यावश्यक खर्चात तरतुद केली असतांना बील थकीत का राहते.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. झिरपे :-** तेवढी रक्कम उपलब्ध होत नाही. जेवढे पैसे येतात तेवढी रकम पाणी पुरवठा अकौंटला टाकतो व तेव्हढी रक्क्म दिले जाते.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** विदयुत वितरण कंपनीला ३ एकर जागा देण्याचा ठराव केला.त्या जागेचे पैसे वळते करा, त्यांनी एवढी टोकाची भूमिका घ्यायला नको.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. झिरपे :-** तुमचे शेडयुल मिळाले तर आम्ही विचार करू असे वितरणने कळविलेल्यानुसार आजच त्यांना त्या प्रमाणे शेडयुल देणार आहोत.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** रू. १ कोटी ६८ लाख अंडरग्राउंड केबल टाकण्याची रकम माफ करा. ते माफ करता येत नसतील तर ती रकम विज बीलपोटी समायोजित करा. अशी त्यांनी मागणी केली आहे. तो महासभेचा विषय आहे. तो निर्णय आपल्याला घ्यावा लागणार आहे. त्यांना आपण रक्कम माफ करता येणार नाही असे कळविले आहे.

**मा.सभापती साहेब :-** आम्ही मा.ना. उर्जा मंत्री श्री.बावनकुळे साहेबांची भेट घेतली. तेथील बैठकीत आम्ही थकीत रकमेचे हाप्ते पाडून देणे,व्याज माफ करणे ,अशी मागणी केली आहे.तसा प्रस्ताव मनपामार्फत सादर करणे बाबत त्यांनी सुचना दिल्या आहेत.

**मा.सौ. सुनिता भिंगारदिवे :-**आमच्या भागात एका नागरीकास कुत्र्याने चावा घेतला आहे.अंदाजपत्रकामध्ये रू.८०लाखाची तरतुद यासाठी केलेली आहे. त्याबाबत माहिती दया कुत्र्यांचा बंदोबस्त होणार की नाही.

**वैदयकीय आरोग्यअधिकारी डॉ. बोरगे:-** मोकाट कुत्र्याचे निर्बीजीकरण करणे बाबत मा.केंद्रशासनाने शासन निर्णय पारित केला आहे. जूनमध्ये पशुगणना करणे आवश्यक आहे. त्यासाठी रू.८० लाखाची तरतुद केली आहे.या निर्णया मधील तरतुदींनुसार कार्यवाही केल्यास सर्व मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त होणार आहे.

**मा.सभापती साहेब :-** एका संस्थेने पिंपळगाव माळवी येथील जागेची मागणी केलेली आहे.जर एखादी संस्था सर्व मोफत हे काम करायला तयार असेल तर काय हरकत आहे. तरतुद राहू दया मनपाचा फायदा होत असेल तर त्या संस्थेचा प्रस्ताव पाहून घ्या.

**वैदयकीय आरोग्यअधिकारी डॉ. बोरगे:-** दोन, तीन दिवस त्या ठिकाणी मोकाट कुत्रे पकडण्यासाठी गाडी पाठविण्यात येईल. मोहीम घेण्यात येईल.

**मा.सभापती साहेब :-** पुढील विषय घ्या.

**पान नं.९ अ.क्र.१७ वरील तरतुदीचे वाचन करण्यात आले.**

**मा.सभापती साहेब :-** शहर बस सेवेची कशी रॉयल्टी मिळते.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** यशवंत ऑटो व मनपा यांच्या मध्ये करार झाला आहे.या करारानुसार प्रति महिना प्रति बस रू.१०००/- रॉयल्टी देणे बाबत करार झालेला आहे. १५ बसेस चे या प्रमाणे रूपये १५०००/- प्रति महिना ते देतात.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** बससेवा सुसज्य पाहिजे,बसच्या काचा तुटलेल्या आहेत त्याचे व्हॉटसॅप ग्रूपवर फोटो आलेले आहेत. त्यावर कमेंट आल्या आहेत. आपण एवढे पैसे त्यांना देतो तरी बससेवेची ही दुरावस्था झालेली आहे.त्यांनी सेवा चांगली दयायला पाहिजे .वृत्तपत्रामध्ये बातमी की,पुण्याच्या महापौर सौ.मुग्धा टिळक यांनी पी.एम.टी.च्या बस मध्ये त्यांच्या महापौर पदाच्या कार्यकाळाच्या पहिल्या दिवशी बस मध्ये प्रवास केला.व नागरीकांच्या अडी -अडचणी जाणून घेतल्या.

**मा.सभापती साहेब :-** तूट कशा संदर्भात देतो. ज्या ठिकाणी बस सेवा देणे परवडत नाही, अशा ठिकाणी बस सेवा ठेकेदार देत नाही.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** कोणत्या रूटवर किती बसेस गेल्या, किती तिकीट विक्री झाली,याचा अहवाल ठेकेदार दर महिन्याला ते देतात. २०१४ मध्ये जेव्हा बससेवा बंद झाले तेव्हा बससेवेबाबत नव्याने टेंडर काढले.

**मा.सभापती साहेब :-** मुदत केव्हापर्यत आहे.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** जानेवारी २०१४ पासून १० वर्षाची मुदत आहे.

**मा.सभापती साहेब :-** मा. शासनाकडे नवीन बस खरेदी साठी एखादा प्रस्ताव पाठविला का ?

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** परिवहनसाठी मा. शासनाच्या योजना नाही. त्यामुळे प्रस्ताव सध्या पाठविला नाही इतर मनपात एस.टी. महामंडळ बससेवा चालविते.

**मा.सभापती साहेब :-** एस.टी. महामंडळाने बसेस चालवाव्यात असा प्रस्ताव पाठवा. मा. शासनाकडे आम्ही पाठपुरावा करू.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** तसा प्रस्ताव मा. शासनाकडे पाठविण्यात येईल.

**पान नं. ९ अ.क्र.३१**

**मा.सभापती साहेब :-** पे पार्क ची तरतुद वाढवून घ्यावी लागेल. इथे तरतुद फक्त रू. १ लाख केली.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** सध्या आनंदऋषी व पोलीस ग्राउंड जवळ पे ॲण्ड पार्क साठी जागा प्रमिमाह रू. १०,०००/- ने दिले आहे.इतर ठिकाणी जागेची शोध मोहिम घेवून पे ॲण्ड पार्क बाबत सुविधा सुरू करण्यात येईल.

**मा.श्री. मुदस्सर शेख :-** झोनवाईज त्या- त्या एरियात जागा दिल्यास शक्य होईल.

**मा.सभापती साहेब :-** मा.जिल्हाधिकारी यांच्या कडेस. चितळेरोड वरील जुने सिव्हील हॉस्पीटल च्या जागेचा पे ॲण्ड पार्क साठी प्रस्ताव पाठविला आहे .तोपर्यत तात्पुरती पार्कीग साठी जागा वापरू शकतो का.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** कोहीनूर जवळील इमारत कंपनीने प्रपोजल दिले आहे.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** इमारत कंपनीचे ६५ सभासद आहेत.त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. बेग पटांगण जागेत मा.आयुक्तांचे मान्यतेने पार्किंग करू शकतो.

**मा.सभापती साहेब :-** हे प्रस्तावीत करा. माणीक चौकात लोक गाडया लावतात. जागा मनपाची असून फि दुसरेच लोक वसुल करतात. अशास्वरूपाचे काही प्लॉट मनपाचे आहे. त्याठिकाणी पे ॲण्ड पार्कीग सुरू करता येईल.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** प्रभाग समिती स्तरावर जागेचे सर्व्हेक्षण करू व जिथे योग्य असेल त्या ठिकाणी पे ॲण्ड पार्कीग साठी प्रस्तावीत करू.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** जागा निश्चित करून निविदा काढण्यात येईल.

**मा.सौ. सुनिता भिंगारदिवे :-** मनपाच्या गांधीनगर शाळेचा स्लॅब पुर्ण गळतो. पावसाळयात पार्ट टाईम शाळा भरते. कंपौड झाले तर बरे होईल. या ठिकाणी मनपाची जागा किती ते निश्चित करून नोटीस दया.

**मा.सभापती साहेब :-** इमारत दुरूस्तीच्या तरतुदीमधून पावसाळयापुर्वी दुरूस्ती करून घेण्यात येईल. श्री. पारखे , इंजि. यांना सूचना दिल्या.काम त्वरीत चालू करा.लवकरच शाळेच्या सुटटी लागणार असल्याने सुट्टीच्या कालावधीमध्ये काम पुर्ण करणे. कंपौडचे इस्टीमेंट दया, कोणत्यात निधी मधून काम करायचे ते ठरवू.

**मा.श्री. मुदस्सर शेख :-** एस टी डेपो समोर २० सीटचे शौचालय आहे.त्याची दुरूस्ती ताबडतोब करा.

**मा.उपायुक्त श्री.बहेरे :-** दिल्ली ची टिम येण्यापूर्वी शौचालयाची दुरूस्ती करून घेण्यात येईल.

**पान नं. ९ अ.क्र.३६ चे वाचन**

**मा.सभापती साहेब :-** मोबाईल टॉवरचे तरतुदी मध्ये जमा व खर्च तरतुदी मध्ये वाढ करावी लागेल.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** एकूण २१२ टॉवर आहे. परमिशन देताना प्रत्येक मोबाईल टॉवर मागे ५० हजार उत्पन्न मिळेल व प्रॉपर्टी टॅक्स वेगळा मिळेल. १६२ मोबाईलटॉवर सध्या आहेत.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** १५३ वर प्रॉपर्टी टॅक्स आकारण्यात आलेला आहे.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** इतर मनपात या बाबतची चौकशी करून त्याप्रमाणे कार्यवाही करतो.

**मा.सभापती साहेब :-** मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क मध्ये प्रशासनाने रू.८० लाखची तरतुद केली असून हि अत्यंत नगन्य आहे. या बाबत टेंडर प्रक्रिया पुर्ण झाली असुन, या कंपनी मार्फत मोबाईल टॉवर संबंधीत कामे करण्यासाठी खाजगी संस्थेची नेमणूक करण्यात आल्याने या लेखाशीर्षी अंतर्गत मोठया प्रमाणात महसूल जमा होणार आहे. या करीता या लेखाशिर्षावर रू. ३.५० कोटीने वाढ करण्यात यावी.

**पान नं.९ अ.क्र.३७ वाचन**

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** झाड तोड परवाना फी वाढ करा. गरज असले तरच त्यामुळे तोडण्यात येईल. भरीव तरतुद करा. विनापरवाना झाड तोड दंडाची रकम वाढवा.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** आज रोजी रू.१०००/- फि आकारण्यात येते.व फांदया तोडण्यासाठी रू.५००/- फी आकारली जाते. वृक्ष प्राधिकरण सभेमध्ये चर्चा होवून प्रोजेक्टरवर चित्रफित पाहून फारच आवश्यकता असेल तरच वृक्ष प्रधिकरण सभेमध्ये झाड तोड परवानगी बाबत योग्य ते निर्णय घेण्यात येतो.

**मा.सभापती साहेब :-** काल अमरधाममधील झाड पडून महिला जखमी झाली.अशा स्वरूपाच्या घटना भविष्यात घडल्यास तरतुद आवश्यक आहे.काल या बाबत सभेमध्ये सुचना दिल्या होत्या.

**मा.सभापती साहेब :-** गॅन्ट्री बाबत ची माहिती देण्यात यावी.

**प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :-** प्रत्येक गॅन्ट्रीकडून रूपये ६ हजार या प्रमाणे २१ गॅन्ट्रीचे एकुण १.२६ लक्ष रूपये उत्पन्न मिळणार आहे. ६ महिन्यापूर्वी बी ओ टी मार्फत बांधकाम विभागामार्फत कारवाई सुरू केली. मनपाच्या २१ रस्त्यावर गॅन्टी बसविण्यात येणार असून गॅन्ट्री वरील अर्ध्या भागात जाहिरात व अर्ध्या भागात दिशा दर्शक फलक असतील.

**शाखा इंजी.श्री.पारखे :-** न्यु टिळक रोड या ठिकाणी काम चालू केलेले आहे. १० वर्षासाठी काम दिलेले आहे. प्रति गॅन्ट्री रू.६०००/- देणार आहे.

**पान नं. ११ करमणूक कर वाचन**

**मा.सभापती साहेब :-** करमणूक करा बाबत ची माहिती दया.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** हा कर मा. शासनाकडून मिळतो.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** मनपा गुंतवणूकीवरील व्याज कशाचे आहे.

**लेखा विभाग श्री. लोंढे :-** मा. शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीवरील गुंतवणूकीवरील व्याज वर्षाचे रूपये ७ कोटी मिळते.ते व्याज त्या- त्या योजनावर वापरतो.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** टेंडर फॉर्म विक्री या तरतुदीत मागे केव्हा वाढ केलेली आहे. त्यात वाढ केली पाहिजे.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** निविदा रकमेवर आपण ती आकारतो.

**शहर अभियंता श्री. रजपुत :-** आता आपण ई - निविदा करतो. शासनाचे ॲम्युअल मध्ये किती फी घ्यावी या बाबतची तरतुद केलेली आहे.

**मा.सभापती साहेब :-** अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक तरतुदी बाबत माहिती दया.

**नगररचनाकार विभाग श्री.पाटील :-** ड वर्ग महानगरपालिकांसाठी मा. शासनाने जी.आर पारित केला आहे. आणि एफ एस आय दयायचा म्हटला तर त्या पोटी परमिशन देताना निम्मा हिस्सा शासनाला व निम्मा मनपा मिळतो. रूपये १ कोटी तरतुद करण्यात आली आहे.

**मा.सभापती साहेब :-** मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी मिळणारे उत्पन्नात रू.६९ लाखांनी वाढ करण्यात यावी.

**पान नं १३ चे वाचन**

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** फेज टू च्या ठेकेदाराने केलेल्या खोदाई मुळे टेलीफोन च्या केबल,पाण्याच्या लाईन,ड्रेनेज लाईन फुटल्या आहेत.व रस्त्याची दुरावस्था झाली आहे. रस्त्यावरील माती उचलली जात नाही.परीसरामध्ये धुळीचे साम्राज्य झाले आहे.नागरीकांच्या तक्रारी आमच्याकडे येतात.संबंधीत कंपनीची जबाबदारी आहे. माती उचलण्याची. त्यांचे वर इंजीनियर यांचे नियंत्रण ठेवण्याचे काम आहे.जेथे मॅन्युअल काम करायचे तेथे जेसीबी व्दारे आवश्यकता नसतांना सुध्दा खोदकाम केले जाते. ॲग्रीमेटमध्ये तसे आहे का जे.सी.बी.ने खोदकाम करावे म्हणून.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** कमी जागेत ज्या पाईप लाईन आहेत,त्या कमी जागेत मॅन्युअली किंवा ब्रेकर लावून काम करणेबाबत आदेश दिले आहे.या बाबत त्यांना लेखी दिलेले आहे. या नुसार काम न केल्यास त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**मा.सभापती साहेब :-** या खोदाई मुळे रस्त्यावरील दुकानदारांना व नागरीकांना धुळीचा मोठया प्रमाणात त्रास होत आहे. काय दंड करावयाचा तो करा, बांधकामाच्या लोकांना सांगून स्क्रीपींग करा. हे ठेकेदाराचे काम आहे.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** मा.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थीत केला आहे.ज्या ठिकाणी जेसीबी वापरणे शक्य नसेल तेथे जेसीबी चा वापर करू नये मॅन्युअली काम करणे आवश्यक आहे.लोकांची गैरसोय होवू नये याची दक्षता घ्यावी. बैठक संपल्या नंतर तात्काळ संबंधीत ठेकेदारास बैठकीतील चर्चे नुसार समक्ष बोलावून समज दयावी. जर तो ऐकत नसेल तर ही बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणावी.

**मा.सभापती साहेब :-** केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते प्रभाग अधिकारी तसेच स्वच्छता निरीक्षक यांनी पहाणी करून महसुल वाढविणे करता प्रयत्न करावेत.या लेखाशिर्षा मध्ये रू.३० लाखाने वाढ करण्यात यावी.

**खर्च बाजु वाचन पान नं.१६ सुरू**

**मा.सभापती साहेब :-** सामाजिक संस्थांना अनुदान माहिती दया.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** रसिक ग्रुप,शिववरद प्रविष्ठाण व वेगवेगळया महिला सांस्कृतीक,सामाजीक संस्था प्रतिवर्षी विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजीत करतात. त्यांना अनुदान दिले जाते.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** रसिक ग्रुप चे श्री.येलुलकर यांना अनुदान केव्हाच मिळाले नाही.

**मा.उपायुक्त श्री.बेहरे :-** मागचे दोन वर्षाचे चेक पेंडींग आहेत.या बाबतची माहिती घेवून योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती साहेब :-** आगामी होणा-या कार्यक्रमाच्या अगोदर चेक दया.

**मा.उपायुक्त श्री.बेहरे :-** आपण कार्यक्रम झाल्यानंतर खर्च ची बीले तपासून योग्य ती नियमानुसार कार्यवाही केली जाते.

**मा.सभापतीसाहेब :-**सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत रसिक ग्रुप,शिववरद प्रविष्ठाण,रायगड तरूण मंडळ ट्रस्ट व वेगवेगळया महिला सांस्कृतीक,सामाजीक संस्था प्रतिवर्षी विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजीत करतात. त्यांना अनुदान दिले जाते.या लेखाशिर्षा मध्ये रू.६ लाखांनी वाढ करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** संगणक दुरूस्ती करीता केलेली तरतुद बाबत माहिती दया.मी एका संगणकाची मागणी केली होती.मला अदयाप संगणक मिळालेला नाही.मी पदावर बसलो तेव्हाची माझी मागणी आहे.केव्हा मिळेल ते सांगा.त्वरीत संगणक बसवुन दया.

**संगणक विभाग प्रमुख श्री.साळी :-** पुरवठादार ठेकेदारास फोन केले आहेत.त्याचे मागील बील पेंडींग आहे.ते दिल्यानंतर संगणक देवू म्हणतो.औरंगाबाद येथील ठेकेदार आहे.

**मा.सभापती साहेब :-** स्पर्धा परिक्षा केंद्रचे बांधकाम पुर्ण झाले आहे काय,कोणती कामे शिल्लक आहेत.

**शाखा इंजी.श्री.पारखे :-** फर्निचर व इंटेरीयल चे काम अदयाप बाकी आहे.

**मा.सभापती साहेब :-** या व्यतीरीक्त कोणत्या बाबी आवश्यक आहेत.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** साधारण दिड ते दोन कोटी रूपये आणखी लागतील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सध्या त्या जागेचा वापर लोक दारू पिण्याकरीता करतात,तेथील नागरीकांनी मा.महापौरांकडे या बाबत तक्रारी केल्या आहेत.

**शाखा अभियंता श्री.पारखे :-** मुलभुत सोई सुविधा या लेखाशिर्षा मधून दोन कोटींची तरतुद केली आहे.नाशिकला प्रस्ताव पाठविला आहे.

**मा.बाळासाहेब बोराटे :-** या हेडवरील तरतुद वाढवा.

**मा.सभापती साहेब :-** सदरचा खर्च हा नाविन्य पुर्ण योजना अनुदान (स्पर्धा परिक्षा इमारत अंतर्गत कामे )या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख तरतुद करा, नोव्हेंबर पर्यत आणखी लागल्यास पुन्हा वाढवा.

**मा.उपायुक्त श्री.बेहरे :-** मुलभुत सोई सुविधा निधी मधील एखादे काम तुर्तास कमी करून या साठी तरतुद करता येईल.मा.महापौर व सर्व पदाधीका-यांनी या बाबत निर्णय घेणे उचित होईल.

**मा.सभापती साहेब :-** मा.महापौर साहेब यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

**अनुक्रमांक १७ वाचन सुरू**

**मा.सभापती साहेब :-**मा.महापौर आपत्कालीन निधी रू.५लाख निधी तरतुद करण्यात यावी,स्व.सदाशिव अमरापुरकर व स्व.निल क्षिरसागर पुरस्कार व इतर अशी या लेखाशिर्षमध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शहरातील विविध सामाजिक ,शैक्षणिक ,धार्मिक संस्था,महापुरूषांची जयंती निमीत्त विविध सामाजीक उपक्रम राबवित असतात. या करीता नविन लेखाशिर्ष तयार करून निधी या संस्थांना उपलब्ध करून दयावा.या निधी मध्ये रू.५लाखाची तरतुर करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** सामाजिक ,शैक्षणिक ,धार्मिक संस्था,महापुरूषांची जयंती निमीत्त विविध सामाजीक उपक्रम राबवित असतात. या करीता नविन लेखाशिर्ष तयार करून निधी या संस्थांना उपलब्ध करून दयावा.या निधी मध्ये रू.५लाखाची तरतुर करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** सावेडी सिटी सर्व्हे गावठाण, तरतुद रू.३० लाख कशासाठी आहे ते सांगा.

**नगररचनाकार श्री.पाटील :-**गावठाणचा सर्व्हे करण्यसाठी जमा बंदी विभागाकडून टेंडर प्रक्रिया करणार आहे.

**मा.सभापती साहेब :-** सेवा पुरवठा शुल्क तरतुद काय आहे.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** मोबाईल टॉवर्स करीता ही तरतुद केली आहे.बील देता यावे म्हणून तरतुद केली आहे.

**मा.सभापती साहेब :-** यामधून सेवा पुरवठादार शुल्क (मोबाईल टॉवर उत्पन्नातुन ) रू.२२ लाखांनी तरतुद वाढवून सेवा शुक्ल देण्यात यावे. मोबाईल टॉवर उत्पन्नातुन विकास कामे करणे हे नविन लेखाशिर्ष तयार करून जमा होणा-या रकमेतुन विकास कामा करीता रू.४ कोटींचा खर्च करण्यात यावा.

**मा.सभापती साहेब :-** वैदयकीय प्रतिपुर्ती करीता आपल्या कडील ३-४ वर्गातील कर्मचा-यांना दवाखाण्यात न्यायचे असेल तर त्याचा खर्च त्यांना परवडत नाही.ते बाहेरील लोकांकडून व्याजाने पैसे आणून उपचार करतात.या वैदयकीय प्रतिपुर्तीचे पैसे त्यांना २ ते ३ वर्ष मिळत नाही.ते आमच्या सारख्यांकडे वारंवार येतात.त्यांची आवस्था अत्यंत बिकट आहे.कर्मचा-यांचे बील आल्या नंतर व्हेरीफिकेशन करून त्वरीत दिले पाहिजे.नगरमधिल दोन चार हॉस्पीटल बाबत कॅशलेस सुविधा देणे बाबत या पुर्वी चर्चा झाली आहे.कर्मचा-यांचे मनोधर्य वाढले पाहीजे या बाबत आत्ताच ठोस निर्णय घेण्यात यावा.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** या पुर्वी मा.महासभा व मा. स्थायी समिती चर्चे नुसार मी मेडीक्लेम कंपन्यांशी चर्चा केली आहे.सर्व कर्मचा-यांना सध्या वैदयकीय प्रतिपुर्ती रूपये दिड कोटी खर्च येतो. मेडीक्लेम कॅशलेस सुविधे करीता दोन ते तीन कंपन्यांशी चर्चा केली असून त्यांनी या कामाकरीता अंदाजे दोन कोटी रूपये प्रिमीयमची मागणी केली आहे.सन २०१७-१८ या आर्थिक वर्षा पासून कर्मचा-यांना कॅशलेस सुविधा देण्यत येईल.या लेखाशिर्षे चे नांव वैदयकिय प्रतिपुर्ती /वैदयकिय विमा योजना असे लेखाशिर्ष करावे यात मध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

**पान क्र.२३**

**मा.सभापती साहेब :-** मिळकत धारक आरोग्य विमा या बाबतची माहिती दया.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** महानगरपालिका हद्दीमधील मिळकत धारकांचा सामुहिक विमा योजना राबविण्या करीता एका प्रॉपर्टी धारकास ३०- ४० रू.खर्च येवू शकतो.प्रत्येक मिळकत धारकांस कर भरण्यास यामुळे प्रोत्साहन मीळू शकते.मिळकत धारकांचा विमा उतरविल्यास टॅक्स लवकर भरण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.त्या करीता टोकन रक्कमेची तरतुद केली आहे.

**मा.सभापती साहेब :-**शहरातील संपुर्ण मिळकत धारकांसाठी विमा योजना करायला पाहिजे.रू.५०लाख तरतुद करा.यामुळे मिळकत धारक नियमीत कर भरतील व त्यांना विम्याचा फायदा त्यांना होणार आहे.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** तरतुदीमध्ये फक्त आरोग्य विमा योजना लिहीली ,अपघात वगैरे झाल्यास आपत्ती आलीतर विमा कंपनीकडून १ लाख रू.विम्याचा लाभ मिळेल. या सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी मालमत्ता धारकाने त्याच्याकडील येणे असलेला संपुर्ण कर भरणे आवश्यक आहे.विमा हप्याची रक्कम मनपा अदा करणार आहे.आरोग्य विम्या ऐवजी मिळकत धारक विमा योजना अशी दुरूस्ती बजेट हेडवर करावी.

**मा.सभापती साहेब :-** हि अत्यंत चांगली योजना असून मिळकत धारक विमा योजना या नांवाने दुरूस्ती बजेट हेडवर करावी. या लेखाशिर्षा अंतर्गत रू.४९लाखांची वाढ करण्यात यावी.जेणे करून मालमत्ता धारक त्यांच्या कडील मालमत्ता कर नियमीत भरतील.

**मा.सभापती साहेब :-** इले.विभागा करीता वाहन खरेदी बाबत काय स्थिती आहे.

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** री ॲप्रोप्रीएशन मध्ये तरतुद झाल्या नंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

**मा.उपायुक्त श्री.बेहरे :-** आजचा स्थायी समितीचा ठराव मंजूर झाला की,वर्क ऑर्डर इश्यु करण्यात येईल.

**मा.सभापती साहेब :-** आउटसोर्सीग व्दारे अग्नीशमन विभागासाठी कर्मचारी भरती करतांना वेतन हे मा.शासनाच्या नियमाप्रमाणे अदा करा .तुटपुंजे वेतन अदा करून नका.

**पान नं.२५**

**मा.सभापती साहेब :-** विद्युत साहित्य खरेदी रू.२५ लाखां केली आहे.एवढी आवश्यक आहे का.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** दरवर्षी तरतुद केली जाते.

**मा.सभापती साहेब :-** मानधनावरील वायरमन यांचे मानधन पोटी शुन्य तरतुद दर्शविली आहे.३१ मार्च पर्यत जर आउट सोर्सींग व्दारे कर्मचारी मिळाले नाही तर मानधनावर वायरमन नेमणूक करावी लागेल.त्याच्या वेतनासाठी तरतुद ठेवा.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** आस्थापना विभागामार्फत तरतुद केली आहे.

**मा.सभापती साहेब :-** शहरातील वाहतुकीच्या व वर्दळीच्या चौक्ामध्ये सध्या वाहतूक नियंत्रणाकरिता सिग्नल आहेत. त्यामुळे रू.१० लाख कमी करून या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१० लाख तरतुद ठेवण्यात यावी.येत्या महिन्याभरात सर्व सिग्नल सुरू झाले पाहिजे.

**पान क्र.२६ अ.क्र.८** नविन वाहन खरेदी वाचन

**श्री.सोनटक्के,कनिष्ठ अभियंता :-** मा.आयुक्तांकरीता एक वाहन व आगामी कोणाची मागणी आल्यास त्या करीता रू.१५ लाख तरतुद केली आहे.

**मा. सभापती साहेब :-** आगामी कोणाची मागणी येणार आहे.? मागणी आल्यास अर्थसंकल्प पुर्नविनियोजन मध्ये पाहू.या करीता रू.१० लाख पुरेसे असल्याने रू.५ लाखांची तरतुद कमी करून ती रू.१० लाख दर्शविण्यात यावी.

**पान क्र.२७ अ.नं.५**

**घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :-** खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे या कामाच्या निविदा करीता ही तरतुद केली आहे,खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक,मेन्टनन्स करीता रूपये ६ कोटी खर्च येतो.या करीता हे हेड ठेवले आहे.मनपाच्या वाहनाचे भाडे मनपास मिळेल.वाहनाचा मेंन्टनन्स,इंधन व वाहन चालक यांचे वेतन इत्यादी खर्च ठेकेदार करणार आहे.दोन दिवसांत टेंडर प्रसिध्द होईल.

**मा.सभापती साहेब :-** रूपये ८ कोटींची तरतुद कशी उपलब्ध करणार.

**घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :-** घनकचरा सेवा शुल्क पोटी चे रू.४ कोटी व १४ व्या वित्त आयोगाच्या ३ -या हप्त्यामधे रू.४ कोटी टाकुन असा रू.८ कोटी खर्च लागणार आहे.१४ व्या वित्त आयोगा च्या निधीतुन रक्कम वर्ग करण्यासाठी मा.महासभेसमोर प्रस्ताव सादर करणार आहे.

**मा.सभापती साहेब :-** १४ व्या वित्त आयोगातून तरतुद प्रस्तावीत केली पाहिजे. घनकचरा सेवा शुल्क पोटी चे रू.४ कोटी व १४ व्या वित्त आयोगाच्या ३ -या हप्त्यामधे रू.४ कोटी टाकुन असा रू.८ कोटी खर्च लागणार आहे.१४ व्या वित्त आयोगा च्या निधीतुन रक्कम वर्ग करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मा.सभापती साहेब :-** पान नं.१४ अ.क्र.२३ घनकचरा संकलन वाहतुकी अंतर्गत मनपा वाहन भाडया पासून उत्पन्न या लेखाशिर्षा मध्ये केलेली तरतुदी मध्ये रू.१० लाखाची वाढ करावी.

पान नं.२७ अ.क्र.१०

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मनपा च्या जुन्या ऑफिस जवळील गॅरेज मध्ये रॅम्पवर कचरा डंपिंग केला जातो.हा अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे.तेथे जवळच तीन ते चार शाळा आहेत.तेथे जवळच महानगरपालिकेचे अधिकारी निवासस्थान आहे.तेथील परिसरामध्ये दुर्गधी असते. या भागात रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**इंजि.श्री.निंबाळकर :-** बी.आर.जी.एफ.मधून दोन ते तीन वेळा रॅम्प साठी वारूळाचा मारूती रोड येथे डंपीग करीता काम मंजूर होते व ते सूरू झाले. परंतु आजुबाजूच्या नागरीकांनी काम बंद पाडले.त्यामुळे या कामाचा निधी परत गेला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पोलीस बंदोबस्तात काम केले पाहिजे.

**मा.उपयुक्त श्री.बेहेरे :-** या जागेचा सात बारा उतारा,फेर काढा.

**मा.सभापती साहेब :-** बांधकाम विभागाकडून या जागे करीता कंम्पौंड वॉल बांधण्यात यावे.मोजणी करून ही जागा ताब्यात घ्या.

**पान नं २७ अ.क्र. १४**

**मा.सभापती साहेब :-** प्लॅस्टीक कलेक्शन सेंटर उभारणे या बाबतची माहिती सांगा.

**प्रकल्प विभाग श्री.मेहेत्रे :-** प्लॅस्टीक कलेक्शन सेंटर उभारणे या लेखाशिर्ष मध्ये खाजगी कचरा वेचक कामगारांची संस्था असून ते घरोघर जावून कचरा कलेक्शन करणा-या गाडयांवरील कामगार प्लास्टीक कचरा गोळा करतात.हा गोळा झालेला कचरा प्लास्टीक कचरा साठविण्यासाठी त्यांना जागा उपलब्ध करून देवून तेथे प्लॅस्टीक कलेकशन सेंटर ची उभारणी करावयाची आहे.

**मा.सभापती साहेब :-** प्लॅस्टीक कचरा हा हवेने सर्वत्र पसरतो त्या मुळे शहराचे विद्रुपीकरण होते.जर हा कचरा या संस्थेच्या कामगारांनी साठविला तर शहराच्या सौदर्यात भर पडणार आहे.या लेखाशिर्षावर रक्कम रूपये ४ लाखांची वाढ करावी.

**मा.सभापती साहेब :-**डेपो सुधारणा व खत प्रकल्प उभारणी या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्यात आलेली रू.७० लाखाची तरतुद दहा लाखांनी कमी करून ती रू.६० लाख दर्शविण्यात यावी.

**पान नं.२९**

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** रामवाडी परिसरात गडाख नाल्याचे काम या पुर्वी काम झालेले नाही.

**घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :-** ओपन ठिकाणी पावसाळयापुर्वी नाले सफाई करण्या येते.पुढच्या महिन्यात पुन्हा नाले सफाई करण्यात येईल.काही भागात अतिक्रमण आहे.त्या ठिकाणी नालेसफाईचे काम मॅन्युअली करण्यात येईल.

**मा.सभापतीसाहेब:-**रक्तपेढी विभागाकरीता नवीन वाहन खरेदी करणेसाठी रू.२०लाख तरतुद पुरेशी आहे का.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे:-** तरतुद कमी आहे. ३० ते ३५ लाख तरतुद करावी लागेल.

**मा.सभापती साहेब :-** रूपये ३५ लाख तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** अपंग पुर्नवसन योजना माहिती सांगा.

**मा.उपायुक्त श्री. बेहेरे :-** एकुण महसूलाच्या ३ टक्के रक्कम अपंगांसाठी राखीव ठेवणे बाबत शासन निर्णय पारित झाला आहे.मा.आ.बच्चु कडू यांची अपंग व दिव्यांग लोकांच्या करीत काम कारणारी प्रहार ही संघटना असून या संघटनेचे अहमदनगर येथील प्रतिनिधीनी वेळोवेळी महानगरपालिकेकडे या शासन निर्णया नुसार अंमलबजावणी करणे करीता पाठपुरावा केला आहे.अपंगासाठी साहित्य मिळणे बाबत मागणी केली आहे.त्यासाठी ही तरतुद आहे.या संदर्भात जनहित याचीका देखील दाखल झाली आहे. मनपा फंडातुन तरतुद करणार आहोत.

**मा.सभापती साहेब :-** नागापूर, बोल्हेगांव, सावेडी परिसरातील नागरिकांना अमरधाम हे लांब अंतरावर असल्याने खर्चिक आहे. सद्यस्थितीत वरील उपनगरामध्ये अमरधामची व्यवस्था नसल्याने शव पायी नेणे शक्य होत नाही. गरीब व गरजू नागरिकांसाठी ॲम्ब्युलन्स मधुन शव नेणे आर्थिक दृष्टया न परवडणारे असल्याने शववाहिका (रथ) करीता रक्कम रु.२५ लाख घसारा निधी मधून तरतुद करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द असलेले मनपाचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये शहरातील तसेच ग्रामीण भागातुनही रूग्ण येत असतांत. प्रशासनाचा हा चांगला उपक्रम या वर्षापासून करण्यात आला आहे जाणुन बुजून कोणी नुकसान करत नाही परंतु काही अडअडचणी व नैसर्गिक कृत्य झाल्याने आाशा घटना घडतात प्रशासनाने सुचविलेल्या बाळांतपणामध्ये गुंतागुंत झाल्यास नुकसान भरपाई (कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना) या नविन लेखाशिर्षामधील तरतुदीमध्ये आणखी रू. ५ लाखाने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मा.सभापती साहेब :-** सावेडी स्मशान भुमी करीता आरक्षीत असलेल्या जागा मालकांस नोटीस बजावण्यात यावी.या संदर्भात यापूर्वी मा.महासभेमध्ये चर्चा झाली आहे.सावेडी येथील स्मशान भुमी संदर्भात परिस्थीती अत्यंत गंभीर आहे. नोटीस बजावून त्याची प्रत स्थायी समितीस सादर करावी.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** आरक्षण हे खाजगी मालकीच्या जागेवर असल्याने २ दिवसांत नोटिस पाठवू.सरकारी जागा स्मशान भूमी करीता उपलब्ध नाही.

**पान नं.३० अ.क्र.४**

**मा.सभापती साहेब :-** हिवताप प्रतिबंध योजना,कंत्राटी पध्दतीने फवारणी करणेसाठी केलेले रू. ४० लाख तरतुद बाबत माहिती दया.

**वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** मनपा नागरी हिवतांप विभागाकडे फक्त विस कर्मचारी असून त्यांचे मार्फत सर्व प्रभागात फवारणी करणे शक्य होत नाही.या करीता पावसाळयातील व साथरोग कालावधीमध्ये वर्षातील सहा महीने औषध फवारणी करणे अवश्यक असते या करीता प्रत्येक प्रभागात औषध फवारणी करणे करीता खाजगी तत्वावर कर्मचा-यांचे वेतन,अत्याधुनिक फॉगींग मशीन खरेदी करणे ,या करीता वाहन खरेदी तसेच  मशिन करीता दैनंदिन इंधन खर्च मोठया प्रमाणात येणार असल्याने तरतुद केलेली आहे.

**मा.सभापती साहेब :-** हिवताप प्रतिबंध योजने करीता रू. ४० लाख ऐवजी रू.३० लाख तरतुद करावी.तरतुद कमी पडल्या नोव्हेंबर मध्ये विचार करू.

**मा.सभापती साहेब :-** कोंडवाडा बाबत माहिती सांगा.किती कर्मचारी आहेत या करीता.

**उदयान विभाग श्री.म्हसे :-** कोंडवाडया करीता शहरामध्ये ४ कर्मचारी आहेत.ते फक्त मोकाट जनावरे हाकलण्याचे काम करतांत.

**मा.सभापती साहेब :-** हे कर्मचारी कोठे असतांत मला कधीही रस्त्यावर जनावरे हकलतांना दिसुन येत नाही.त्यांना गणवेश घालून मनपाचे ओळख पत्र लावून काम करायला सांगा,मी व अधिकारी व पदाधिकारी स्वत: त्यांची पहाणी करणार आहे.कोंडवाडा खाजगी तत्वावर दया. यावरील केलेली तरतुदी मधून रू.१० लाख कमी करण्यात यावेत.

**पान नं.३१**

**मा.सभापती साहेब :-** वृक्षरोपण व संरक्षण/ट्री गार्ड खरेदी /यंत्र सामुग्री लागणारे खरेदी तरतुद ४४ लाख केली होती . प्रत्येक नगरसेवक ट्री गार्ड ची मागणी करतांत ,तरतुद शिल्लक असूनही मा.नगरसेवकांनी मागणी चे पत्र दिलेले असतांना सुध्दा  ट्री गार्ड दिलेले  नाही. हि अत्यंत गंभीर स्वरूपाची बाब आहे.प्रत्येक विभागातील त्यांच्या कडील लेखार्शिर्ष नुसार  किती बजेट मंजूर आहे. त्यातुन झालेला खर्च व राहिलेली शिल्लक या बाबत ऑफिस मध्ये बोर्ड लावण्यात यावा.या संदर्भात माहिती नागरीकांना दिसेल.ज्या विभागांचे बजेट हेड मंजूर आहे.त्याच विभागाने खरेदी करावी.मा.नगरसेवकांनी ट्री गार्ड ची मागणी केली असतांनाही व निधी शिल्लक असतांना ट्री गार्ड दिलेले नाही.त्या मुळे म्हसेंवर

कारवाई प्रस्तावीत करावी.या करीत दर्शविण्यात आलेली रू.७५ लाखांची तरतुदी मधून रू.२५ लाख कमी करून ती रू.५० लाख दर्शविण्यात यावी व वृक्ष गणना व नंबर टाकणे या लेखाशिर्षा मध्ये रू.३० लाख दर्शविण्यात आले असून मागील तीन वर्षा पासून वृक्ष गणना होत नाही.ही तरतुद कमी करून रू.१० लाख ठेवण्यात यावी.

**मा.सौ.भिंगारदिवे सुनिता :-** भारत बेकरी समोर महानगरपालिकेचा मोकळा भुखंड आहे.त्याठिकाणी उदयान विकसीत करण्यात यावे.

**मा.सभापती साहेब :-** सावेडी, नागापुर, बोल्हेगांव या भागातील उदयानासाठी मा.सौं.भिंगादिवे मॅडम यांनी सुचविल्या प्रमाणे बोल्हेगांव सर्व्हे नं. ६८/१/२ मधील जागेत झाडे लावणे,कंम्पौड करणे व इतर कामा करीता रू.१० लाख तरतुद करावी.इतर ठिकाणी छोटे - मोठे ओपन स्पेस मध्ये मागणी नुसार त्याठिकाणी उदयान करावे.

**मा.सभापती साहेब :-** बागेतील खेळणी व देखभाल दुरूस्ती ठेवा.

**पान नं.३२ वाचन**

**विकास भार निधी मधून खर्च**

**नगररचनाकार श्री.पाटील :-** विकास योजना प्रस्तावाच्या सुधारणा विकासा साठी अशी या लेखाशिर्षा मध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** मा.महासेभेध्ये चर्चा करून या बाबत निर्णय घेण्यात येईल., फक्त मिटींग साठी नविन इमारती मधील सभागृह भरपुर होते.गावातील सभागृहचे काम बी.ओ. टी. तत्वावर करा.खाजगी विकसका मार्फत खर्च करून वापर सुरू होईल. ऐतीहासीक वारसा असलेली हि वास्तु असून तीचा वारसा आपण जतन केला पाहिजे. नगरपालिकेची ऐतीहासीक वास्तु आहे.तीचा वापर विदयार्थ्याकरीता अभ्यासिका,ऑडीटोरीयम करीता होवू शकतो., रस्ते दुरूस्ती (डांबरीकरण रू.२० लाख,सिमेंट रस्ते रू.२० लाख ,खडीचे रस्ते रूपये १० लाख ) या लेखाशिर्षा अंतर्गत असणारी रक्कम रूपये १.५० कोटी मधून रस्ते खादाई फी मधून रस्ते करणे / दुरूस्ती या हेडवर रू. १ कोटी तरतुद ठेवा सध्या शुन्य तरतुद दाखविलेली आहे.

**पान नं.३३ वाचन**

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पान नं.३२ वरील सभागृह नुतनीकरण साठी रू.३२ लाख तरतुद गेली कुठे या पैशाची विल्हेवाट कुठे लावली आहे.

**शाखा अभियंता श्री.पारखे :-** रूपये १ कोटी ४० लाख तरतुद जकात ठेकेदाराकडून प्राप्त आहे.त्यातील रूपये ४१ लाख मा.आयुक्त निवासासाठी महासभेच्या ठरावानुसार केला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सभागृहाचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाले आहे.आत्ता पर्यत किती पेमेंट दिले या कामाचे.

**शाखा अभियंता श्री.पारखे :-** रू.६५ लाखांचे पेमेंट अत्तापर्यत दिलेले आहे.ठेकेदार स्वत:जकात अभिकर्ताच आहे.या कामाचे टेंडर काढले नाही.

**मा.उपायुक्त श्री बेहेरे :-** जकात ठेकेदाराकडून रक्कम डिपॉझिट म्हणून जमा केली व ज्या प्रमाणात सभागृहाचे काम झाले त्या प्रमाणात डिपॉझीट मधून रक्कम वेळोवेळी रक्कम अदा केली आहे.

**शाखा अभियंता श्री.पारखे :-** डी.एस.आर. रेट नुसार काम झाले. डी.एस.आर. रेट व्यातिरीक्त कामाचे रेट आर्कीटेक इंजी.श्री.कांकरीया बाजार भावानुसार दर निश्चित करून देतात.

**मा.सभापती साहेब :-** सभागृहाच्या राहिलेल्या कामाचे टेंडर काढा.ज्या ठेकेदाराला काम दिले त्या ठेकेदाराला ७ दिवसाची नोटिस दया.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** ठेकेदारस नोटिस काढा.

**लेखा विभाग श्री.लोंढे :-** डिपॉझीट खात्यात रक्कम शिल्लक आहे.जेवढे काम झाले त्या कामाचे बील अदा केले आहे.

**मा.सभापती साहेब :-** ऑडीटर यांनी सभागृहाच्या कामाचे ऑडीट करावे या बाबतचा अहवाल स्थायी समितीस सादर करावा.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे:-** ठेकेदारास नोटीस दया.

**मा.सभापती साहेब :-** नोटीस देण्याची आवश्यकता नाही.सभागृहामध्ये यावर चर्चा झाली आहे.या बाबत आरोप झाले आहेत.या करीता राहिलेल्या कामाबाबत निविदा काढता येईल का? दोन दिवसांमध्ये सहकार एजन्सी बरोबर मिटींग लावा.मिटींगच्या नोंदी ठेवा.

**शहर अभियंता श्री.रजपुत :-** ठराव पाहून घेतो, त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**पान नं.३६ वाचन**

**सभापती साहेब :-** मनपाच्या शाळा किती आहेत.

**शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी श्रीमती पारचे :-** १२ शाळा चालू आहेत,शाळेच्या २६ इमारती आहेत.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** पुर्वीच्या शिक्षण मंडळामार्फत खाजगी संस्थांना वर्ग खोल्या भाडयाने दिल्या आहेत.

**मा.सभापती साहेब :-** शहरातील खाजगी शाळांनी वर्ग खोल्यांची मागणी केल्यास त्यांना खोल्या देण्यात याव्यात.

**पान नं३७ वाचन**

**मा.सभापती साहेब :-** केडगांव पाणी पुरवठया बाबत मा.श्री.सातपुते साहेब यांनी मागणी केल्या नुसार त्वरीत टेंडर काढा., नगर पाणीपुरवठा योजना कर्ज ( हुडको ) / वित्त संस्था अशी लेखाशिर्ष मध्ये दुरूस्ती करण्यात यावी. , मा.महापौर साहेब,सभागृह नेते, मा.श्री.बाळासाहेब बोराटे नगरसेवक ,मा.श्रीमती जाधव नगरसेविका यांनी वेळोवेळी विरशैव लिंगायत समाज स्मशान भुमीस भेट देवून समक्ष पहाणी केली.तेथे काही मुलभुत सुविधा करणे गरजेचे आहे.या करीता रू.१० लाख ची तरतुद कंम्पौड,पाणी पुरवठा इ.साठी करण्यात यावी.नगरसेविका मा.सौ.सुनिता भिंगारदिवे यांच्या मागणी नुसार बोल्हेगांव सर्व्हे नं.३ मध्ये नविन स्मशान भुमी विकसित करणे करीता रू.१० लाखांची तरतुद करण्यात यावी.

**पान नं.३९ वाचन**

**मा.सभापती साहेब :-** अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.नळ धारकांकडून जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. १ कोटीची वाढ करण्यात यावी.तसेच पाणी विक्री या लेखाशिर्षाअंतर्गत रू.२१ लाखाची वाढ सूचविण्यात येत आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मागील वर्षी मोठया प्रमाणात सर्व शहरामध्ये वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्ष लागवडी करीता मा.नगरसेवक ,विविध सामाजिक संस्थांचे मोठे योगदान दिले आहे.ब-याच ठिकाणी शहरातील रस्त्यांच्या डिव्हायडर मध्ये झाडांची लागवड करण्यात आली आहे.या झाडांना मनपाच्या टॅकर व्दारे पाणी देणे आवश्यक आहे.सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने वृक्ष संवर्धन करणे करीता मनपा मार्फत टॅकर व्दारे पाणीपुरवठा करणे गरजेचे असल्याने झाडांना टॅकर व्दारे पाणीपुरवठा करणे हे नविन लेखाशिर्ष तयार करून या करीता रू.१०लाखाची तरतुद करण्यात यावी.

**मा.सभापती साहेब :-** सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने वृक्ष संवर्धन करणे करीता मनपा मार्फत टॅकर व्दारे पाणीपुरवठा करणे गरजेचे असल्याने झाडांना टॅकर व्दारे पाणीपुरवठा करणे हे नविन लेखाशिर्ष तयार करून या करीता रू.१०लाखाची तरतुद करण्यात यावी.

**पान नं.४६ खर्च बाजू वाचन**

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** वॉर्ड विकास निधीवर तरतुद केलेली नाही.

**मा.सभापती साहेब :-** मा.नगरसेवकांना आपल्या प्रभागामध्ये तातडीचे कामे करावी लागतात याकरिता पान नं.४७ वर अ.नं.१४ प्रभाग विकास निधी स्वेच्छा निधी करता रू.५ ोटी २३ लाखाची तरतुद करण्यात आली आहे.एकुण नगरसेवकांची संख्या विचारात घेता प्रत्येक नगरसेवकांस रू.७लाख ४७हजार निधी मिळणार आहे.हा निधी तोडका असल्याने वार्ड विकास निधी यालेखाशिर्षाअंतर्गत रू.२ ोटी १९ लाखाची तरतुद करण्यात यावी.त्यामुळे प्रभागात कमीत कमी रू.१० लाखा पर्यतची कामे करता येतील.

**मा.सभापती साहेब :-** अधिकारी यांचे निवास बांधणे व सोई सुविधा या लेखाशिर्षा अंतर्गत रू.३५ लाखाच्या तरतुदी मधून रू.१६ लाख कमी करून रू. १९ लाख दर्शविण्यात यावी. , पान नं.४७ क्र.१३ पिंपळगांव माळवी तलाव विकसीत करणे,सन २०१६-१७ साठी रूपये ५ लाख व सन २०१७-१८ साठी रूपये ८ लाखाने वाढ करून तरतुदी मध्ये रूपये १५ लाख दर्शविण्यात यावे., पान नं.४५ क्र.१२ वर घनकचरा प्रक्रिया अनुदानासाठी १४ व्या वित्त आयोगातून रू.१ कोटी २५ लाख तरतुद करावी.

**पान नं.४९ वाचन**

**मा.सभापतीसाहेब :-**प्रिमीयम व्यतीरीक्त रकमेतुन बुरूडगांव रोड येथील एफ.बी.टी.तत्वावरील इमारतील व्यायामशाळेकरीता व्यायाम साहित्य खरेदीकरणे यालेखाशिर्षा अंतर्गत बुरूडगांवयेथील एकाच व्यायाम शाळेला साहित्य देण्यापेक्षा शहरातील इतर व्यायामशाळेला सुध्दा व्यायाम साहीत्य देता येईल का?

**नगररचनाकार श्री.पाटील :-** हो देता येईल.

**मा.सभापती साहेब :-** बुरूडगांव रोड येथील एफबीटी तत्वावरील इमारतीतील व्यायाम साहित्य खरेदी एकाच व्यायाम शाळेकरीता खरेदी न करता प्रिमीयम व्यतीरीक्त रकमेतुन बुरूडगांव रोड येथील एफ.बी.टी.तत्वावरील इमारतील व्यायामशाळे करीता व्यायाम साहित्य खरेदी करणे रू.३ लाख ,नालेगांव येथील नाना पाटिल वस्ताद तालमीच्या व्यायाम साहित्य खरेदी करीता रू.१० लाख ,बुरूडगांव रोड येथील मनपाच्या फुलसौंदर मळा व्यायाम शाळे करीता व्यायाम साहित्य खरेदी करीता रू.५ लाख व श्रमीक नगर येथील व्यायाम शाळे करीता व्यायाम साहित्य खरेदी करीता रू.५ लाख,केडगांव प्र.क्र.३१ मध्ये ओपन जीम साठी व्यायाम साहित्य खरेदी करणे करीता रू.५ लाख, माळीवाडा येथील सौभाग्य सदन महिला जीम साठी व्यायाम साहित्य खरेदी करणे करिता रूपये २२ लाख या तरतुदी मधून खर्च करण्यात यावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शहरासाठी नाविन्य पुर्ण योजना केल्या पाहिजे.

**मा.सभापती साहेब :-** शहरालगत असलेल्या पुणे,औरंगाबाद,नाशिक येथील मुख्य रस्त्यांच्या आजूबाजला सुशोभीकरण कलेले दिसून येते.या धर्ती वर नगरशहरामध्ये विविध रस्त्यांचे बाजुस सुशोभीकरण केल्यास शहराच्या वैभवात भर पडेल.या करीता पदपथावर सुशोभीकरण करणे हे नविन लेखाशिर्षा तयार करून त्यावर रू.५० लाखांची भरीव तरतुद करण्यात यावी.

मनपाचे सर्व कार्यालये ,बँक,कॉलेज,हॉस्पीटल,दवाखाने सर्व सार्वजनिक ठिकाणे एस.टी. स्टॅण्ड,रेल्वे स्टेशन शहातील ऐतिहासीक मंदिरे, विविध ठिकाणची गजबलेले चौक याठिकाणी वायफाय इंटरनेट सुविधा देणे करिता वाय-फाय सेवा खर्च हे नवीन लेखाशिष निर्माण करून त्या अंतर्गत रू.३० लाखाची तरतुद करण्यात यावी.तसेच गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठे , विविध चौकात भुरटया चो-या ,महिलांचे दागिने हिसाकवणे , मुलींचे छेड काढणारे असे प्रकारे होतात. सीसीटीव्ही कॅमेराची व्यवस्था केल्यास गुन्हेगारावर वचक बसुन गुन्हे आटोक्यात येतील व अनुचित प्रकार घडणार नाहीत. प्रमुख चौकात सी सी टी व्ही कॅमरे बसविणे लेखाशिर्षातंतर्गत रू.२५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

**मा.श्री. मनोज दुलम :-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ या अंदाजपत्रकीय मिटींग साठी मा.आयुक्त , मा.उपायुक्त (सा./कर),सर्व विभाग प्रमुख, पत्रकार बंधू यांनी मेहनत घेतली आहे.काही तरतुदी आपण सुचविल्या बद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने आभार मानतो.कोणत्याही प्रकारे फुगीर बजेट दिलेले नाही. वास्तव बजेट या वर्षी मांडले आहे.आपणासर्वाचे आभार मानतो ,अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर करतो.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे. मा. महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समिती सभेस अंदाजपत्रक विचारार्थ सादर करण्यात आले. मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस ही सभा शिफारस करित आहे.

**तसेच**

* सर्वसाधारण कर वसुलीमध्ये वस्तुनिष्ठपणाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये अपेक्षीत उत्पन्नाची आकडेवारीत ५ टक्के ने वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

* GIS कार्यप्रणालिच्या माध्यमातुन सुरु असलेल्या सर्व्हे व्दारे नविन मालमत्तेची माहिती उपलब्ध होणार आहे त्यादृष्टीने मालमत्ता नोंदणी फी बाबत नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा ओघ पहाता तरतुद उत्पन्नात रु.२५ लाख वाढ करावी.

* जाहीरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात आलेली तरतुद अतिशय कमी आहे. शहराचा वाढता विस्तार व व्यवसाय लक्षात घेता या माध्यमातुन भरीव उत्पन्न मिळू शकेल. यास्तव रू.७ लाखाने तरतुद वाढविण्यात यावी.

* केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते प्रभाग अधिकारी तसेच स्वच्छता निरीक्षक यांनी पहाणी करून महसुल वाढविणे करता प्रयत्न करावेत.अशा प्रकारच्या कामाची फी वसुल केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. यादृष्टीने उपाय योजना करण्यांत यावी. रस्ता फोडणे,जोडणे वसूली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये ३० लाख रुपयांनी तरतुदी मध्ये वाढ करण्यात यावी.

* चालू रेडीरेकनरच्या दरानुसार भाडे आकारणी केल्यास उत्पन्नात भर पडणार असल्याने गाळा भाडे लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.

* गाळे हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरीत राबवून गाळे हस्तांतरण फी या लेखाशिर्षामध्ये रू.१५ लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

* मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क मध्ये प्रशासनाने रू.८० लाखची तरतुद केली असून हि अत्यंत नगन्य आहे. या बाबत टेंडर प्रक्रिया पुर्ण झाली असुन, या कंपनी मार्फत मोबाईल टॉवर संबंधीत कामे करण्यासाठी खाजगी संस्थेची नेमणूक करण्यात आल्याने या लेखाशीर्षी अंतर्गत मोठया प्रमाणात महसूल जमा होणार आहे. या करीता मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क लेखाशिर्षावर रू. ३.५० कोटीने वाढ करण्यात यावी.

* कलम ४१ खाली प्रस्ताव दाखल केल्यानंतर महासभेने दंडात्मक आकरणी करून जास्तीत जास्त उत्पन्न वाढीच्या दृष्टीने प्रयत्न करून अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये रू.१० लाखांनी वाढ करण्यात यावी.

* घनकचरा संकलन वाहतुकी अंतर्गत मनपा वाहन भाडया पासून उत्पन्न या लेखाशिर्षा मध्ये केलेली तरतुदी मध्ये रू.१० लाखाची वाढ करण्यात यावी.

* मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.६९ लाखांनी वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.नळ धारकांकडून जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. १ कोटीची वाढ करण्यात यावी.

* पाणी विक्री जमा या लेखाशिर्षाअंतर्गत रू.२१ लाखाची वाढ करण्यात यावी.

* स्पर्धा परिक्षा इमारत अंतर्गत कामे करणे करीता नाविन्य पुर्ण योजना अनुदान(स्पर्धा परीक्षा इमारत अंतर्गत कामे ) या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख तरतुद करण्यात यावी.

* वित्तीय संस्थांकडून विकास कामांसाठी कर्ज उभारणी करणे करीता रू.१ लाखाची तरतुद करण्यात यावी.

* मा.महापौर आपत्कालीन सहाय्यता निधी या लेखाशिर्षा मध्ये रु.३ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* स्व.सदाशिव अमरापुरकर, स्व.अनिल क्षिरसागर व इतर कलावंत पुरस्कार अशी या लेखाशिर्ष मध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

* महापुरूषांची जयंती निमीत्त विविध सामाजीक उपक्रम राबवित असतात. या करीता नविन लेखाशिर्ष तयार करून निधी उपलब्ध करून दयावा.या निधी मध्ये रू.५लाखाची तरतुद करण्यात यावी.

*  मालमत्ता धारक त्यांच्या कडील मालमत्ता कर नियमीत भरतील.या उद्देशाने मिळकत धारक आरोग्य विमा योजना या लेखाशिर्षा चे नांवा मध्ये मिळकत धारक विमा योजना अशी दुरूस्ती लेखाशिर्षा मध्ये करावी तसेच या लेखाशिर्षा अंतर्गत रू.४९लाखांची वाढ करण्यात यावी.

*  सेवा पुरवठादार शुल्क (मोबाईल टॉवर उत्पन्नातुन ) या लेखाशिर्षा मध्ये रू.२२ लाखांनी वाढ करण्यात यावी. सेवा शुक्ल देण्यात यावे.

* मोबाईल टॉवर उत्पन्नातुन विकास कामे करणे हे नविन लेखाशिर्ष तयार करून मोबाईल टॉवर उत्पन्नातुन जमा होणा-या रकमेतुन विकास कामा करीता रू.४ कोटींचा खर्च करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* डेपो सुधारणा व खत प्रकल्प उभारणी या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्यात आलेली रू.७० लाखाची तरतुद १० लाखांनी कमी करून ती रू.६० लाख करण्यात यावी.

*  शहराचे विद्रुपीकरण रोखण्या करीता प्लॉस्टीक कलेक्शन सेंटर उभारणे या लेखाशिर्षा वरील तरतुदीमध्ये रक्कम रूपये ४ लाखांची वाढ करण्यात यावी.

*  बाळांतपणामध्ये गुंतागुंत झाल्यास नुकसान भरपाई (कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना) या नविन लेखाशिर्षामधील तरतुदीमध्ये आणखी रू. ५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* वृक्ष संवर्धन करणे करीता मनपा मार्फत टॅकर व्दारे पाणीपुरवठा करणे गरजेचे असल्याने झाडांना टॅकर व्दारे पाणीपुरवठा करणे हे नविन लेखाशिर्ष तयार करून या करीता रू.१०लाखाची तरतुद करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

*  कर्ज फेड हप्ता भरणे या लेखाशिर्षा मध्ये रू.१ लाखाने वाढ करण्यात यावी.

*  सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत रसिक ग्रुप, गुडी पाडवा उत्सवा करीता रू.१.५० लाख,शिववरद प्रतिष्ठाण गुडी पाडवा उत्सव करीता रू.१.५० लाख, रायगड तरूण मंडळ ट्रस्ट उत्सवा करीता रू.१.५०लाख व वेगवेगळया महिला सांस्कृतीक,सामाजीक संस्था प्रतिवर्षी विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजीत करतात. त्यांना अनुदान दिले जाते. सामाजिक संस्थांना देणगी लेखाशिर्षा मध्ये रू.६ लाखांनी वाढ करण्यात यावी.

*  कर्ज व्याज हप्ता भरणे या लेखाशिर्षा मध्ये रू.१ लाखाने वाढ करण्यात यावी.

* नगरशहरामध्ये विविध रस्त्यांचे बाजुस सुशोभीकरण केल्यास शहराच्या वैभवात भर पडेल.या करीता पदपथावर सुशोभीकरण करणे हे नविन लेखाशिर्षा तयार करून त्यावर रू.५० लाखांची भरीव तरतुद करण्यात यावी.

* विरशैव लिंगायत समाज स्मशान भुमीस काही मुलभुत सुविधा करणे गरजेचे आहे. कंम्पौड,पाणी पुरवठा इ.साठी व बोल्हेगांव सर्व्हे नं.३ मध्ये नविन स्मशान भुमी विकसित करणे करीता नविन लेखाशिर्ष निर्माण करून प्रत्येकी रू.१० लाख ची तरतुद करण्यात यावी.

*  कोंडवाडा बांधकाम करणे या लेखाशिर्षा मधून रू.१० लाख कमी करण्यात यावेत. तसेच कोंडवाडा खासगी तत्वावर चालविण्यास देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा.

* नागापूर, बोल्हेगांव, सावेडी परिसरातील नागरिकांना अमरधाम हे लांब अंतरावर असल्याने खर्चिक आहे. सद्यस्थितीत वरील उपनगरामध्ये अमरधामची व्यवस्था नसल्याने शव पायी नेणे शक्य होत नाही. गरीब व गरजू नागरिकांसाठी ॲम्ब्युलन्स मधुन शव नेणे आर्थिक दृष्टया न परवडणारे असल्याने शववाहिका (रथ) करीता रक्कम रु.२५ लाख घसारा निधी मधून खर्च करण्यात यावी.

* हिवताप प्रतिबंध योजना - कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू. ४० लाख ऐवजी रू.३० लाख तरतुद ठेवण्यात यावी.

* बोल्हेगांव येथील सर्व्हे नं. ६८/१/२ येथे उदयान विकसीत करणे हे नविन लेखाशिर्ष तयार करून रू.१० लाख तरतुद करण्यात यावी.

* प्रिमीयम व्यतिरीक्त रकमेतून बुरूडगांव रोड येथील एफ.बी.टी तत्वावरील इमारतीतील व्यायाम साहित्य खरेदी या नविन लेखाशिर्षा मध्ये नमुद रू.५० लाख तरतुदी मधून रू.४७ लाख कमी करण्यात यावे.

* एफ.बी.टी तत्वावरील इमारतीच्या प्रिमीयम व्यतिरीक्त मिळणा-या रक्कमेतून नालेगांव येथील नाना पाटिल वस्ताद तालमी साठी व्यायाम साहित्य खरेदी करीता रू.१० लाख. एफ.बी.टी तत्वावरील इमारतीच्या प्रिमीयम व्यतिरीक्त मिळणा-या रक्कमेतून बुरूडगांव रोड येथील मनपाच्या फुलसौंदर मळा व्यायाम शाळे करीता व्यायाम साहित्य खरेदी करीता रू.५ लाख, एफ.बी.टी तत्वावरील इमारतीच्या प्रिमीयम व्यतिरीक्त मिळणा-या रक्कमेतून श्रमीक नगर येथील व्यायाम शाळे करीता व्यायाम साहित्य खरेदी करीता रू.५ लाख, एफ.बी.टी तत्वावरील इमारतीच्या प्रिमीयम व्यतिरीक्त मिळणा-या रक्कमेतून केडगांव प्र.क्र.३१ मध्ये ओपन जीम साठी व्यायाम साहित्य खरेदी करणे करीता रू.५ लाख, माळीवाडा येथील सौभाग्य सदन महिला जीम साठी व्यायाम साहित्य खरेदी करणे करिता रूपये २२ लाख या प्रमाणे लेखाशिर्ष व तरतुद करण्यात यावी.

* वॉर्ड विकास निधी या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रु.२ कोटी १९ लाखाची तरतुद करण्यात यावी.

* नगरसेवक स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधी अंतर्गत झालेल्या कामाचे देयके अर्थविभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती १५ दिवसांमध्ये अदा करण्यात यावी.

* मार्केट विभाग वसूल करीत असलेल्या गाळे भाडे पोटी येणा-या उत्पन्नातुन मंगलगेट मटन मार्केट दुरूस्ती करण्यात यावी व याकरीता मंगलगेट मटन मार्केट दुरूस्त हे नविन लेखाशिर्ष तयार करून या मध्ये रू.५० लाख तरतुद करण्यात यावी.

* शहरातील कै.बाळासाहेब देशपांडे उद्यान (सिध्दीबाग) व महालक्ष्मी उद्यान खासगी तत्वावर चालविण्यास देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. याबाबतची कार्यवाही त्वरीत करावी. शहर अभियंता श्री रजपुत व श्री.गोयल यांनी यामध्ये विशेष लक्ष देवुन कार्यवाही करावी.

* रस्ते दुरूस्ती (डांबरीकरण रू.२० लाख,सिमेंट रस्ते रू.२० लाख ,खडीचे रस्ते रूपये १० लाख ) या लेखाशिर्षा अंतर्गत असणारी तरतुद १ कोटी ने कमी करण्यात यावी.

* रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे / दुरूस्ती या हेडवर रू. १ कोटी तरतुद करण्यात यावी. सदर हेड मध्ये केबल साठी खादाई करण्यात येणा-या फी मधून प्राप्त होणारी रक्कम जमा करण्यात यावी.

* रक्त संकलन करणेसाठी नविन अत्याधुनिक पध्दतीने सुसज्य वाहन खरेदी करणेची ही सभा शिफारस करीत आहे. नविन वाहन खरेदी (रक्तपेढी )या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु. १५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* गजबलेले ठिकाणी वायफाय इंटरनेट सुविधा देणे करिता वाय- फाय सेवा खर्च हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्या अंतर्गत रू. ३० लाखाची तरतुद करण्यात यावी.

* प्रमुख चौकात सी.सी.टी.व्ही.कॅमरे बसविणे लेखाशिर्षाअंतर्गत रू. २५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* शालेय क्रिडा भरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१ लाखाने वाढ करण्यात यावी.

* सांस्कृतीक कार्यक्रम घेणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* अधिकारी यांचे निवास बांधणे व सोई सुविधा या लेखाशिर्षा अंतर्गत रू.३५ लाखाच्या तरतुदी मधून रू.१६ लाख कमी करून रू. १९ लाख दर्शविण्यात यावी.

* पिंपळगांव माळवी तलाव विकसीत करणे,सन २०१६-१७ साठी रूपये ४ लाख व सन २०१७-१८ साठी रूपये ७ लाखाने वाढ करून तरतुदी मध्ये रूपये १५ लाख दर्शविण्यात यावे.

* वाहतुक नियंत्रक देखभाल या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१० लाख तरतुद कमी करण्यात यावी.

* नविन वाहन खरेदी (मो.व्हे.)यालेखाशिर्षा अंतर्गत रू.५लाखांनी तरतुद कमी करण्यात यावी.

* वृक्षारोपण,वृक्ष संरक्षण व ट्रि गार्ड खरेदी / यंत्र सामुग्री,अवजारे खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रू.७५लाखांची तरतुदी मधून रू.२५ लाख कमी करून ती रू.५० लाख दर्शविण्यात यावी.

* वृक्ष गणना व नंबर टाकणे या लेखाशिर्षा मध्ये रू.३० लाख दर्शविण्यात आले असून मागील तीन वर्षा पासून वृक्ष गणना होत नाही.ही तरतुद कमी करून रू.१० लाख ठेवण्यात यावी.

* बुरूडगांव व सावेडी येथे सॅनेटरी लॅण्ड फिल विकसीत करणे करीता १४ व्या वित्ता आयोगातुन तरतुद करण्यात आली आहे.मात्र या कामात रक्कम रूपये १ कोटी २५ लाख वाढीव निधीची आवश्यकता असल्याने सदर रक्कम १४व्या वित्त आयोगातुन अथवा उपलब्ध असलेल्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या व्याजाच्या रकमेतुन सदरचा वाढीव खर्च भागविण्यात यावा.

* घनकचरा सेवा शुल्क पोटी चे रू.४ कोटी व १४ व्या वित्त आयोगाच्या तीस-या हप्त्यामधील रूपये ३ कोटी टाकुन असा रू.७ कोटी खर्च कचरा संकलनणावर करावा लागणार आहे. १४ व्या वित्त आयोगा च्या निधीतुन रूपये ४ कोटी रक्कम कचरा संकलनावर खर्च करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* पान नं.४२ अ.क्र.१ क मधील नगरशहर पाणी पुरवठा योजना कर्ज (हुडको) या लेखाशिर्षा मध्ये दुरूस्ती करून नगरशहर पाणी पुरवठा योजना कर्ज (हुडको) / वित्तीया संस्था असा बदल करण्यात यावे.अथवा वित्तीय संस्थांमधन विकास कामासाठी खर्च उभारणी या साठी रूपये १ लाख टोकन तरतुद करण्यात यावी.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ सालचे बाबवार अंदाजपत्रक मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. मनोज दुलम सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
(श्री.सचिन तुकाराम जाधव)
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

| अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१६-२०१७ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१६)........................................८६३.५५ | | | | | |
| एकुण जमा...................................................................... ४८८१५.५७ | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.............................................. ४९६७९.१२ | | | | | |
| एकुण खर्च...................................................................... ४९३१८.८४ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१७).................................... ३६०.२८ | | | | | |
| | | | | | |
| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन १६-१७ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कर्जफेड हप्ता भरणे | ७.३३ | ०.५० | | ७.८३ |
| २ | कर्ज व्याज हप्ता भरणे | ६.७५ | ०.५० | | ७.२५ |
| ३ | पिंपळगाव तलाव विकसीत करणे | ०.०१ | ३.९९ | | ४.०० |
| ४ | मनपा पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण | १५.०० | | ४.९९ | १०.०१ |
| | **एकुण** | **२९.०९** | **४.९९** | **४.९९** | **२९.०९** |

सही /-
सभापती, स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर** | | | | | |
| **मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१७-२०१८ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)** | | | | | |
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१७)........................................३६०.२८** | | | | | |
| **एकुण जमा...................................................................... ५४६७२.९१** | | | | | |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................... ५५०३३.१९** | | | | | |
| **एकुण खर्च..................................................................... ५४५१७.४७** | | | | | |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१८)....................................५१५.७२** | | | | | |
| **अ.नं.** | **लेखाशिर्ष (जमा बाजू ) सन २०१७-१८** | **मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद** | **मा.स्थायी समिती ने केलेला बदल** | | **मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद** |
| | | | वाढ | **घट** | |
| १ | २ | ३ | ४ | **५** | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४१००.०० | २०५.०० | | ४३०५.०० |
| २ | मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क | ८०.०० | ३५०.०० | | ४३०.०० |
| ३ | गाळे भाडे | १५०.०० | २०.०० | | १७०.०० |
| ४ | गाळे हस्तांतरण फी | ८५.०० | १५.०० | | १००.०० |
| ५ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | ६०.०० | १०.०० | | ७०.०० |
| ६ | मालमत्ता नांव नोंदणी फी | ३००.०० | २५.०० | | ३२५.०० |
| ७ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ५.५० | ७.०० | | १२.५० |
| ८ | रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | १२५.०० | ३०.०० | | १५५.०० |
| ९ | घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा भाडेपासुन उत्पन्न | ४०.०० | १०.०० | | ५०.०० |
| १० | अतिरिक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम | १००.०० | ६९.०० | | १६९.०० |
| ११ | नळ धारकाकडून जमा पाणीपट्टी | २०००.०० | १००.०० | | २१००.०० |
| १२ | पाणी विक्री जमा | १०००.०० | २१.०० | | १०२१.०० |
| १३ | नाविन्य पूर्ण योजना अनुदान (स्पर्धा परीक्षा इमारत अंतर्गत कामे) | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १४ | वित्तीय संस्थांकडून विकास कामांसाठी कर्ज उभारणे | ०.०० | १.०० | | १.०० |
| | एकुण | **८०४५.५०** | **९१३.००** | **०.००** | **८९५८.५०** |

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१७-१८ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महापौर आपत्कालीन सहाय्यता निधी | २.०० | ३.०० | | ५.०० |
| २ | महापुरुषांची जयंती/पुण्यतिथी खर्च | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| ३ | मिळकतधारक आरोग्य विमा योजाना | १.०० | ४९.०० | | ५०.०० |
| ४ | प्लास्टिक कलेक्शन सेंटर उभारणे | १.०० | ४.०० | | ५.०० |
| ५ | बाळंतपणामध्ये गुंतागुंत निर्माण झाल्यास नुकसान भरपाई (कै. बा. दे. दवाखाना) | ५.०० | ५.०० | | १०.०० |
| ६ | झाडांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| ७ | कर्ज फेड हप्ता भरणे | ८.२४ | १.०० | | ९.२४ |
| ९ | सामाजिक संस्थाना देणगी | ४.०० | ६.०० | | १०.०० |
| १० | कर्ज व्याज हप्ता भरणे | ५.८४ | १.०० | | ६.८४ |
| ११ | पदपथावर सुशोभिकरण करणे | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १२ | विर शैव लिंगायत गवळी समाज स्मशानभूमी सुधारणा | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| १३ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | २१९.०० | | २१९.०० |
| १४ | मंगलगेट मटन मार्केट दुरुस्ती | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १५ | वाय-फाय सेवा खर्च | ०.०० | ३०.०० | | ३०.०० |
| १६ | प्रमुख चौकात सी. सी. टी. व्ही. कॅमेरा बसविणे | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| १७ | बोल्हेगाव स. नं. ३ येथे नविन स्मशानभुमी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| १६ | मोबाईल टॉवर उत्पन्नातून विकास कामे करणे | ०.०० | ४००.०० | | ४००.०० |
| १९ | कोंडवाडा बांधकाम करणे | २०.०० | | १०.०० | १०.०० |
| २० | रस्ते दुरुस्ती (डांबरीकरण २० लाख, सिमेंट रस्ते २० लाख, खडीचे रस्ते १० लाख) | १५०.०० | | १००.०० | ५०.०० |
| २१ | रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे/ दुरुस्ती | ०.०० | १००.०० | | १००.०० |
| २२ | शालेय क्रीडा स्पर्धा भरविणे | २.०० | १.०० | | ३.०० |
| २३ | सांस्कृतिक कार्यक्रम घेणे | २.०० | ५.०० | | ७.०० |
| २४ | सेवा पुरवठादार शुल्क (मोबाईल टॉवर उत्पन्नातुन ) | १८.०० | २२.०० | | ४०.०० |
| २५ | नाविन्य पूर्ण योजना अनुदान (स्पर्धा परीक्षा इमारत अंतर्गत कामे) | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २६ | नविन वाहन खरेदी (रक्तपेढी) | २०.०० | १५.०० | | ३५.०० |
| २७ | वित्तीय संस्थांकडून विकास कामांसाठी कर्ज उभारणे | ०.०० | १.०० | | १.०० |
| २८ | अधिकारी यांचे निवास बांधणे व सोयी सुविधा | ३५.०० | | १६.०० | १९.०० |
| २९ | पिंपळगाव तलाव विकसीत करणे | ८.०० | ७.०० | | १५.०० |
| ३० | बोल्हेगाव येथील स. नं. ६८/१/२ येथे उद्यान विकसीत करणे | ०.०० | १०.०० | | १०.०० |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१७-१८ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ३१ | वाहतुक नियंत्रक देखभाल | २०.०० | | १०.०० | १०.०० |
| ३२ | नविन वाहन खरेदी (मो. व्हे.) | १५.०० | | ५.०० | १०.०० |
| ३३ | डेपो सुधारणा व खत प्रकल्प उभारणे | ७०.०० | | १०.०० | ६०.०० |
| ३४ | वृक्षारोपण, वृक्ष संरक्षण व ट्री गार्ड खरेदी/ यंत्र सामुग्री, अवजारे खरेदी | ७५.०० | | २५.०० | ५०.०० |
| ३५ | वृक्ष गणना व नंबर टाकणे | ३०.०० | | २०.०० | १०.०० |
| ३६ | प्रिमियम व्यतिरिक्त रकमेतून बुरुडगाव रोड येथील एफबीटी तत्वावरील इमारतीतील व्यायाम शाळेकरीता व्यायाम साहित्य खरेदी | ५०.०० | | ४७.०० | ३.०० |
| ३७ | एफबीटी तत्वावरील इमारतीच्या प्रिमियम व्यतिरिक्त मिळणा-या रकमेतून नालेगाव येथील पाटील वस्ताद तालीमसाठी व्यायाम साहित्य खरेदी | | १०.०० | | १०.०० |
| ३८ | एफबीटी तत्वावरील इमारतीच्या प्रिमियम व्यतिरिक्त मिळणा-या रकमेतून बुरुडगाव रोड येथील फुलसौंदर मळा येथील तालीमसाठी व्यायाम साहित्य खरेदी | | ५.०० | | ५.०० |
| ३९ | एफबीटी तत्वावरील इमारतीच्या प्रिमियम व्यतिरिक्त मिळणा-या रकमेतून श्रमिकनगर येथील तालीमसाठी व्यायाम साहित्य खरेदी | | ५.०० | | ५.०० |
| ४० | एफबीटी तत्वावरील इमारतीच्या प्रिमियम व्यतिरिक्त मिळणा-या रकमेतून केडगावमधील प्रभाग क्र. ३1 मधील ओपन जिमसाठी व्यायाम साहित्य खरेदी | | ५.०० | | ५.०० |
| ४१ | एफबीटी तत्वावरील इमारतीच्या प्रिमियम व्यतिरिक्त मिळणा-या रकमेतून माळीवाडा येथील सौभाग्य सदन महिला जिमसाठी व्यायाम साहित्य खरेदी | | २२.०० | | २२.०० |
| ४२ | हिवताप प्रतिबंधक योजना- कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे | ४०.०० | | १०.०० | ३०.०० |
| | **एकुण** | **६२३.०८** | **११३६.००** | **२५३.००** | **१४६५.०८** |

सही/-
सभापती स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर